SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
हा सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो बर्डपार्क / झीप लाईन अ‍ॅडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्टस्
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०३.०६.२०२६ | अंक नं. ०५४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# मान्सून लवकरच भारताच्या उंबरठ्यावर

नवी दिल्ली – भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या अ‍ॅडव्हान्स ऑफ साउथवेस्ट मान्सूनच्या ताज्या नकाशानुसार, नैऋत्य मोसमी पावसाने (मान्सून) भारताच्या दिशेने आपली आगेकूच वेगाने सुरू ठेवली आहे. ३ जून पर्यंतच्या स्थितीनुसार मान्सून वेगाने उत्तरेकडे सरकत असून, पावसाच्या आगमनासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. ४ ते ५ जूनदरम्यान मान्सून केरळ आणि दक्षिण किनारपट्टीवर सक्रिय होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या ताज्या नकाशानुसार मध्य महाराष्ट्रात हा पाऊस पोहोचण्यास १४ ते १५ जून उजाडू शकतो.

भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या ताज्या नकाशानुसार मान्सूनने बंगालच्या उपसागराच्या मोठ्या भागासह अंदमान आणि निकोबार बेटांचा टप्पा ओलांडला आहे. सद्यस्थितीनुसार ३ जूनपर्यंत मान्सूनने बंगालच्या उपसागरातून लक्षणीय प्रगती केली आहे. मान्सूनची व्याप्ती आता भारताच्या मुख्य भूमीजवळ पोहोचली असून, पुढील दोन दिवसांत तो केरळ आणि उर्वरित दक्षिण किनारपट्टीवर सक्रिय होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. मान्सूनच्या या प्रगतीमुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिक आणि बळीराजासाठी ही दिलासादायक बातमी मानली जात आहे. हवामान विभागाच्या या

## ४ ते ५ जूनदरम्यान केरळमध्ये होणार दाखल

अद्ययावत माहितीनुसार, मान्सूनचा पुढील प्रवास वेळेत पूर्ण होईल, अशी चिन्हे दिसत आहेत. शेतकऱ्यांनी पावसाच्या या आगमनाकडे डोळे लावून धरले असून, पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना वेग आला आहे.

### वारंवार बदलावे लागले अंदाज

देशात वार्षिक पावसापैकी तब्बल ७० टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे पडतो. साधारणपणे १ जून रोजी मान्सूनचे केरळमध्ये आगमन होते आणि तिथून तो टप्प्याटप्प्याने देशभर पसरतो. यंदा १५ एप्रिल रोजी हवामान विभागाने २७ मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल होईल, असा अंदाज वर्तवला होता. मात्र, मे महिन्यातील वातावरणीय बदलांमुळे हा अंदाज चुकला आणि मान्सून लवकर दाखल होण्याऐवजी उशिराने दाखल होत आहे. हवामान शास्त्रज्ञांच्या मते, मे महिन्याच्या अखेरीस अंदमानमधील पाऊस आणि दाट ढगांची स्थिती पाहता, मान्सून लवकर येण्यासाठी परिस्थिती अत्यंत अनुकूल होती. याच सकारात्मक वातावरणामुळे हवामान विभागाने सुरुवातीचे अंदाज वर्तवले होते. मात्र, वातावरणात अचानक झालेल्या बदलांमुळे हवामान तज्ज्ञांना आपले गणित पुन्हा मांडावे लागले. त्यामुळे मान्सूनच्या तारखाही बदलत गेल्या.

### मान्सूनला विलंब, शेतीवर परिणाम

मान्सूनच्या या विलंबामुळे महाराष्ट्रातील शेतीवरही परिणाम होणार आहे. यापूर्वीच्या अंदाजानुसार, १० जूनपर्यंत मान्सून मध्य महाराष्ट्रात पोहोचणे अपेक्षित होते. परंतु, आताच्या बदललेल्या स्थितीनुसार मान्सूनला मध्य महाराष्ट्रात दाखल होण्यासाठी १४ ते १५ जूनची तारीख उजाडण्याची शक्यता आहे. मान्सूनच्या या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांच्या पेरणीपूर्व मशागतीच्या कामांचे नियोजन विस्कळीत झाले असून, पावसाच्या आगमनाकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

# पोलिसांना हेल्मेटची सक्ती

## मागील २० दिवसांत ३० कर्मचाऱ्यांवर कारवाई; ३० हजार रुपयांचा दंड वसूल

नगर – वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणाऱ्या पोलीस विभागाने आता पोलीस कर्मचाऱ्यांसाठीही कडक भूमिका घेतली असून, पोलीस असाल तरी सूट नाही हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला आहे. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशानुसार, पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात विनाहेल्मेट प्रवेश करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांनाही थेट एक हजार रुपयांचा दंड ठोठावला जात आहे. आतापर्यंत ३० पोलीस अमलदारांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून तब्बल ३० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी दिली.



जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर विनाहेल्मेट येणाऱ्या पोलिसांवर कारवाई करताना शहर वाहतूक शाखेचे कर्मचारी.

वाहतूक शिस्तीची सुरुवात स्वतःच्या विभागापासून व्हावी, या भूमिकेतून पोलीस प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. नागरिकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतःही त्याचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करत पोलीस अधीक्षकांनी ही मोहीम सुरू केली आहे. त्यामुळे यापुढे हेल्मेटशिवाय दुचाकीवरून येणाऱ्या पोलीस कर्मचारी, अधिकारी यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. तसेच आदेश पोलीस अधीक्षकांनी वाहतूक शाखेला बजावले आहेत. त्यामुळे वाहतूक शाखेचे कर्मचारी रोज विनाहेल्मेट येणाऱ्या पोलिसांवर कारवाई करीत आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय आणि पोलीस मुख्यालय परिसरात दररोज सकाळी विशेष तपासणी मोहीम राबविली जात आहे. कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर विनाहेल्मेट पोलीस आढळल्यास त्यांच्यावर तत्काळ दंडात्मक कारवाई केली जाते. याशिवाय शहरात दिवसभर पोलीस पथकांकडून पेट्रोलिंगदरम्यानही तपासणी सुरू असून, विनाहेल्मेट वाहन चालवणारे पोलीस कर्मचारी आढळल्यास त्यांच्यावरही नियमानुसार दंड आकारला जात आहे. त्यामुळे विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी अधिक जागरूकता निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी स्पष्ट केले आहे की, वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत कोणालाही विशेष सवलत दिली जाणार नाही. पोलीस कर्मचारी स्वतः नियमांचे पालन करतील, तेव्हाच नागरिकांमध्ये योग्य संदेश जाईल. त्यामुळे विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हेल्मेटचा वापर अनिवार्यपणे करावा, तसेच नागरिकांनीही स्वतःच्या सुरक्षेसाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मध्यरात्रीच्या सुमारास एकाच मालकाच्या शहरात वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या दोन कार पेटविल्या

नगर – अज्ञात समाजकंटकांनी एकाच मालकाच्या वेगवेगळ्या ठिकाणी पार्क केलेल्या दोन कार पेटवून दिल्याची धक्कादायक घटना ३ जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास शहरातील कोतवाली पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली आहे. या आगीत दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले असून, या प्रकरणी कार मालक गौरव विनायक कुलकर्णी यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.





फिर्यादीनुसार ३ जून रोजी मध्यरात्री २:३० च्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी गौरव विनायक कुलकर्णी (वय ३३, रा. शनी चौक, गुजर गल्ली, अहिल्यानगर) हे त्यांच्या कुटुंबासह घरी झोपलेले असताना त्यांचे काका राजाभाऊ कुलकर्णी यांना घराबाहेर काहीतरी जळाल्याचा वास आला. त्यांनी खिडकीतून खाली पाहिले असता घराजवळ खाली उभ्या केलेल्या त्यांच्या होंडा एक्स्टर (क्र. एमएच १६, डीएस ३३२३) या कारतून धूर निघत असल्याचे दिसून आले. गौरव कुलकर्णी व त्यांच्या काकांनी तातडीने खाली येऊन पाण्याचा वापर करत आग विझवण्याचा प्रयत्न केला. प्राथमिक तपासणीत गाडीचे बोनेट, मडगार्ड आणि आतील वायरिंग जळून खाक झाल्याचे निष्पन्न झाले.

ही आग विझवून घरात जात असताना गौरव कुलकर्णी यांना अग्निशमन दलाच्या गाडीचा आवाज ऐकू आला. त्यामुळे त्यांनी त्यांच्या दुसऱ्या कारची चौकशी करण्यासाठी जुन्या कोर्टगल्लीकडे धाव घेतली. त्यांची दुसरी कार कौटुंबिक न्यायालय कमानीच्या शेजारी व निशा हॉस्पिटलसमोर उभी केलेली होती. कुलकर्णी तेथे पोहोचले असताना त्यांची दुसरी महिंद्रा एक्स युव्ही ५०० (क्र. एमएच १६, डीएस ५५५०) ही गाडी जळताना दिसून आली. कारला भीषण आग लागलेली होती व अग्निशमन दलाचे जवान ती आग विझवत होते. अग्निशमन विभागाने ही आग आटोक्यात आणली, परंतु तोपर्यंत या गाडीचेही सीट, बोनेट, वायरिंग आणि काचा पूर्णपणे जळून नुकसान झाले होते.

एकाच रात्री दोन गाड्यांना कोणी आणि का आग लावली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस नाईक निता अडसरे पुढील तपास करत आहेत.

CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

Kashmir
For 4 nights 5 Days
Starts @ 16800/-
Packages Available
5D, 6D, 7D...
Namoh Since 1981 A Total Travel Solution...
For details contact :- 73505 30009 | 73505 40009 | 73505 50009
www.namohtours.com
Ticket Bookings | Hotel Bookings | International & Domestic Tours | Railway Tours | Customized Tours | Corporate Tours | Group Tours | MICE | Insurance | Passport/ Visa

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# एमआयडीसी परिसरातून लाखो रुपयांचे कॅमेरे, मोबाईल लंपास

### अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - एमआयडीसी परिसरातील चेतना कॉलनीतून अज्ञात चोरट्याने खोलीचा उघडा दरवाजा पाहून आत प्रवेश केला आणि तब्बल ३ लाख २ हजार रुपयांचे साहित्य चोरून नेले. यामध्ये महागडा व्हिडिओ कॅमेरा, रोख रक्कम आणि पाच महागडे मोबाईल फोन यांचा समावेश आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरव संभाजी खराडे हा तरुण व्यवसायनिमित्त चेतना कॉलनी परिसरात राहतो. घटनेच्या दिवशी गौरव आणि त्याचे मित्र खोलीमध्ये झोपलेले होते. पहाटेच्या सुमारास त्याचा एक मित्र खासगी कामासाठी बाहेर जाताना खोलीचा दरवाजा उघडा ठेवून निघून गेला. हीच संधी साधून अज्ञात चोरट्याने खोलीत प्रवेश केला आणि खोलीत ठेवलेला दीड लाख रुपये किमतीचा महागडा कॅमेरा, लेन्स, कॅमेरा स्टँड आणि मेमरी कार्ड चोरले. यासोबतच चोरट्याने खोलीतील २ हजार रुपयांची रोख रक्कम आणि वेगवेगळ्या कंपन्यांचे पाच महागडे मोबाईल फोन असा एकूण ३ लाख २ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. सकाळी हा प्रकार लक्षात आल्यानंतर गौरव खराडे याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार सुद्रीक करत आहेत.

# देशाच्या विकासाचा पाया असलेल्या जनगणनेसाठी नागरिकांनी पुढे यावे

### मनपा आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन

नगर - देशाच्या भविष्याचा आराखडा तयार करणाऱ्या आणि शासनाच्या विकास योजनांना दिशा देणाऱ्या जनगणना २०२७ च्या घरगणना टप्प्यातील पहिले पंधरा दिवस पूर्ण झाले आहेत.या कामास गती मिळून विहित मुदतीत जनगणना कार्य पूर्ण व्हावे म्हणून प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी अहिल्यानगरकरांना आवाहन केले आहे.

आपल्या दारी येणारा प्रगणक हा केवळ कर्मचारी नसून तो राष्ट्रनिर्मितीच्या महत्त्वपूर्ण कार्याचा दूत आहे. उन्हाचा तडाखा, व्यस्त दिनक्रम आणि विविध अडचणींचा सामना करत तो आपल्या घरापर्यंत पोहोचत आहे. अशा वेळी दरवाजा न उघडणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे किंवा चुकीची माहिती देणे हे केवळ जनगणना प्रक्रियेलाच नव्हे तर देशाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारे ठरते, असे आयुक्त डांगे यांनी म्हटले आहे.

ते पुढे म्हणाले की, जनगणना ही कोणत्याही व्यक्तीची किंवा कार्यालयाची मोहीम नसून ती संपूर्ण राष्ट्राची जबाबदारी आहे. आज आपण दिलेली अचूक माहिती उद्याच्या पिढ्यांसाठी शाळा, रस्ते, रुग्णालये, पाणीपुरवठा, घरे आणि विविध कल्याणकारी योजनांचे नियोजन ठरविण्यास मदत करते. त्यामुळे जनगणना म्हणजे केवळ माहिती संकलन नसून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली एक अमूल्य गुंतवणूक आहे.

जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत संकलित होणारी सर्व माहिती पूर्णतः गोपनीय असून ती कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा विभागाला वैयक्तिक स्वरूपात दिली जात नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही शंका किंवा भीती न बाळगता सत्य, अचूक आणि संपूर्ण माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

घरगणनेचे उर्वरित १५ दिवस अत्यंत महत्त्वाचे असून १४ जून पर्यंत हे कार्य पूर्ण करावयाचे आहे. त्यामुळे प्रत्येक अहिल्यानगरकराने आपल्या दारी आलेल्या प्रगणकाचे स्वागत करावे, काही मिनिटांचा वेळ द्यावा आणि मोबाईलवर होणारी जनगणना प्रक्रिया पूर्ण करून देशाच्या या ऐतिहासिक राष्ट्रीय मोहिमेत आपला मोलाचा सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी केले आहे.

# चोवीस तास वीज पुरवठा खंडित राहत असेल तर बाजारपेठेला कायमचे कुलूप लावायचे का?

### किरण काळेंचा सवाल; बाजारपेठ अधोगतीकडे....महावितरण विरोधात तीव्र आंदोलनाचा ठाकरे शिवसेनेचा इशारा



नगर - काही क्षणांसाठी अवकाळी पाऊस, वादळ सुटलं. परंतु अवघ्या काही मिनिटांमध्ये संपूर्ण शहराची वीज यंत्रणा मृत होऊन पडली. शहराच्या अनेक भागांमध्ये बारा ते चौदा तास वीज नव्हती. कहर म्हणजे शहराचा आत्मा असणाऱ्या बाजारपेठेत तर तब्बल चोवीस तास वीज पुरवठा खंडित होता. त्यानंतरही विजेचा लपंडाव सतत सुरूच आहे. काही लोकांना बाजारपेठेला कायमचे कुलूप लावायचं आहे का, असा संतप्त सवाल ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

थोड्या वेळासाठी झालेल्या पावसाने संपूर्ण वीज पुरवठा यंत्रणात कोलमडून पडल्यानंतर ठाकरे शिवसेनेने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. काळे म्हणाले, बाजारपेठेसह शहर अधोगतिकडे चालले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून माळीवाडा बस स्टँड ते सर्जेपुरा हा बाजारपेठेचा मुख्य रस्ता गायब झाला आहे. मध्यवर्ती शहरातील काही रस्ते खोदून तीन-चार महिने लोटले तरी देखील अद्याप पर्यंत काम पुढे सरकायला तयार नाही. जाणून बुजून बाजारपेठेतील कामे रखडवली जात आहेत. प्रश्नांचा गुंता तयार केला जात आहे. प्रशासन नेमके करते तरी काय ? जाणीवपूर्वक बाजारपेठेला वेठीस धरण्याचा कुणाचा डाव आहे काय ? असं सवाल काळेंनी केला आहे.

**काहींच बाजारपेठ उध्वस्त करण्याचं षडयंत्र :** शहराच्या उपनगरांमध्ये मोक्याच्या ठिकाणी राजकीय नेतृत्वाच्या भागीदारीतून मर्जीतल्या बिल्डरांचे काही प्रकल्प, मॉल नियम धाब्यावर बसवून उभे राहत आहेत. शहराची बाजारपेठ उध्वस्त झाल्या शिवाय त्यांच्या गाळ्यांना गिऱ्हाईक मिळणार नाहीत. म्हणून अनेक दशकांची परंपरा असणारी ऐतिहासिक मूळ बाजारपेठ उध्वस्त करण्याचा षडयंत्र काही राजकीय मंडळींच्या आशीर्वादाने राबविल जात असल्याचा आरोप किरण काळे यांनी केला आहे.

**वीज, रस्त्याचा प्रश्न मार्गी लावा :** विजेचा लपंडाव थांबला पाहिजे. पावसाळा सुरू होत आहे. दर शनिवारी बाजारपेठेसह शहरामध्ये महावितरण शट डाऊन घेत असते. या काळात मग नेमका कोणता मेंटेनन्स केला जातो ? मेन्टेनन्स होऊन देखील लाईट गेल्यावर ती तात्काळ पूर्वत का होत नाही ? हे थांबणार नसेल तर महावितरण प्रशासनाचे विरोधात ठाकरे शिवसेना तीव्र आंदोलन छडील असा इशारा किरण काळे यांनी दिला आहे. काही भाजप पदाधिकाऱ्यांनी महावितरणच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली होती. त्याचा धागा पकडत काळे म्हणाले, भाजपने हे त्यांच्या नेत्यांना, महायुतीच्या लोकप्रतिनिधींना सांगावे. जे लोक 'अर्थ'पूर्ण स्वार्थासाठी पडद्या अडून बाजारपेठेला वेठीस धरतात त्यांचेच कार्यकर्ते लोकांचा कळवळा असल्याचा खोटा आव आणतात, असा टोला काळेंनी लगावला आहे.

# कायद्याचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या १० अवैध दारू विक्री करणाऱ्या जामीनदारांच्या ७/१२ उताऱ्यावर चढविला प्रत्येकी १ लाखाचा बोजा

नगर - राहुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईची मोहिम तीव्र केली आहे. दारूबंदी कायद्याचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या १० अवैध दारू विक्रेत्यांच्या जामीनदारांच्या ७/१२ उताऱ्यावर प्रत्येकी १ लाख रुपयांचा शासन वसुलीचा बोजा चढविण्याचे आदेश २ जून २०२६ रोजी पारित करण्यात आले आहेत.

राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सन २०२५ मध्ये दारूबंदी कायद्यांतर्गत २२१ गुन्हे, तर २०२६ मध्ये मे अखेरपर्यंत १५४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मागील दीड वर्षांत वारंवार गुन्हे करणाऱ्या अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध दारूबंदी अधिनियम कलम ९३ अन्वये १५५ प्रतिबंधात्मक प्रस्ताव श्रीरामपूर प्रांताधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले होते. यापैकी १२१ प्रकरणांत संबंधित विक्रेत्यांकडून प्रत्येकी १ लाख रुपयांचे बाँड घेण्यात आले होते. मात्र, बाँड देऊनही १० अवैध दारू विक्रेत्यांनी पुन्हा अटींचे उल्लंघन करत अवैध दारू विक्री सुरूच ठेवली. याबाबत राहुरी पोलिसांनी ठोस पुरावे सादर केल्यानंतर प्रांताधिकाऱ्यांनी या १० विक्रेत्यांना प्रत्येकी १ लाख रुपयांचा दंड ठोठावला. आरोपींनी दंडाची रक्कम न भरल्यामुळे आता आरोपींच्या जामीनदारांच्या मालमत्तेवर हा बोजा चढविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईचा यशस्वी पाठपुरावा पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, समाधान फडोळ, राजेंद्र जाधव तसेच पोहवा सूरज गायकवाड, राहुल यादव, गणेश मैड, सचिन कोळी व वृषाली कुसळकर यांनी केला.

एक लाखांचे दंड ठोठावलेले आरोपी व कंसात त्यांच्या जामीनदारांची नावे - कैलास रामचंद्र कुसमुडे (रा. वांबोरी, जामीनदार : सतीश अण्णासाहेब ढवळे), मोहन भागवत बोरुडे-बर्डे (रा. कुरणवाडी, जामीनदार : काशिनाथ भागवत ढवान), दिलीप अंबादास कुसमुडे (रा. वांबोरी, जामीनदार : सचिन इंद्रभान गडाख), काशिनाथ अंबादास चव्हाण (रा. तांदुळवाडी, जामीनदार : जनार्दन बाबुराव हिवाळे), दीपक मधुकर पडघलमल (रा. सत्रळ, जामीनदार : नवनाथ नारायण पिंपळे), नितीन साहेबराव मुंतुडे (रा. चिंचाळे, जामीनदार : संदीप गंगाधर कोळसे), नवनाथ जोतिराम वाघ (रा. राहुरी, जामीनदार : अनिता राजाराम पाटील), जनार्दन रंगनाथ पवार (रा. मानोरी, जामीनदार : नीरज सुधाकर मेहेत्रे), माणिक चंद्रभान पवार (रा. वळण, जामीनदार : राजेंद्र शंकर पवार) आणि अशोक सूर्यभान गुंजाळ (रा. देवळाली प्रवरा, जामीनदार : सुरेश सोन्याबापू साळुंके).

### आरोपींना जामीनदार होताना काळजी घ्या : पोलिसांचे आवाहन

राहुरी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही आरोपीस जामीन देताना तो अटींचे पालन करेल याची खात्री करूनच जामीन द्यावा. अन्यथा, आरोपीने अटींचा भंग केल्यास जामीनदारांनाही आर्थिक भुर्दंड सहन करावा लागेल आणि त्यांच्या मालमत्तेवर शासन वसुलीचा बोजा चढविला जाऊ शकतो. त्यामुळे आरोपींना जामीनदार होताना काळजी घ्यावी, असे आवाहन राहुरी पोलिसांनी केले आहे.

# प्रस्तावित असलेला 'मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा' राज्यात हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा

### तात्काळ रद्द करण्यात यावा : अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर विश्वस्तांची व्यापक बैठक




टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर, विश्वस्त, पुजारी यांच्या बैठकीचे आयोजन विश्व हिंदू परिषद मंदिर, अर्चक, पुरोहित आयमाच्या वतीने करण्यात आले होते.

नगर - मंदिरांना शेकडो वर्षांपूर्वी समाजहित, धार्मिक परंपरा, नित्य पूजा-अर्चा, उत्सव, अन्नदान, धर्मशाळा, वेदपाठशाळा आणि सामाजिक उपक्रमांसाठी इनामी जमिनी देण्यात आल्या होत्या. या जमिनी केवळ मालमत्ता नसून हिंदू समाजाच्या श्रद्धा, परंपरा आणि धार्मिक व्यवस्थेचा आधार आहेत. प्रस्तावित कायद्यामुळे मंदिरांच्या आर्थिक स्रोतांवर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.हा कायदा हिंदू देवस्थानांच्या बाबतीतच हस्तक्षेप करणारा असून धार्मिक समतेच्या तत्त्वालाही बाधा पोहोचवणारा आहे. महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा हा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा असून हिंदू धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा संपूर्णतः रद्द करून नवीन तज्ञ समितीमार्फत व्यापक अभ्यासानंतर नवीन प्रारूप तयार करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्रातील विविध देवस्थानांनी आणि विश्व हिंदू परिषदेतर्फे करण्यात येत आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे मंदिर, अर्चक, पुरोहित संपर्क आयामाचे पुणे विभाग प्रमुख ॲड.विलास महाजन यांनी केले आहे.

टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर, विश्वस्त, पुजारी यांच्या बैठकीचे आयोजन विश्व हिंदू परिषद मंदिर, अर्चक, पुरोहित आयमाच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खाकीदास बाबा मठ ट्रस्ट चे अध्यक्ष चंद्रकांत काबरा, ॲड. श्रीराम भारदे, ह भ प रामदास क्षीरसागर महाराज, विश्व हिंदू परिषदेचे मंदिर, अर्चक, पुरोहित संपर्क आयामाचे पुणे विभाग प्रमुख ॲड.विलास महाजन, श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त पंडितराव खरपुडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली.

महाजन पुढे म्हणाले, मंदिर एवं अर्चक पुरोहित संपर्क विभागाच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र प्रांतात ठिकठिकाणी विविध देवस्थानच्या विश्वस्तांची एकत्र बैठक घेऊन सदर विषयी जागरण करण्याचे काम आज चालू आहे. त्यामध्ये प्रस्तावित कायद्याची माहिती आणि त्यामध्ये असणाऱ्या आवश्यक सुधारणा याबाबत चर्चा केली जाते. सदर उपक्रमास मंदिरांच्या विश्वस्तांचाही उत्तम प्रतिसाद मिळत आहे त्यामुळे अधिकाधिक ठिकाणी सदर विषय पोहोचवणे व मंदिर विश्वस्तांच्या सह्यांचे निवेदन सरकारपर्यंत पोहोचवणे यासाठी परिषद पुढील काळात अधिक क्रियाशील राहणार आहे.

या बैठकीत ॲड. श्रीराम भारदे, ह भ प रामदास क्षीरसागर महाराज यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात श्रीकांत नांदापूरकर म्हणाले, मंदिरांच्या मालमत्ता, परंपरा आणि धार्मिक स्वायत्ततेचे संरक्षण करणारी स्पष्ट तरतूद करण्यात यावी. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी राज्यभरातील देवस्थान, अर्चक, पुजारी आणि हिंदू समाजाशी व्यापक चर्चा करण्यात यावी. हिंदू समाजाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रस्तावित कायदा आपले हिंदुत्ववादी सरकार मागे घेईल, असा आम्हाला विश्वास आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र सोनवणे यांनी केले. ॲड.जयदिप देशपांडे यांनी आभार मानले.

या बैठकीसाठी जिल्हातील मंदिर विश्वस्त पुजारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विश्व हिंदू परिषद मंदिर आर्चक पुरोहित आयामाचे प्रांत टोळी सदस्य ॲड. जयदीप देशपांडे, विभाग टोळी सदस्य मिलिंद मोभारकर, गजेंद्र सोनवणे, हरिभाऊ डोळसे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्ध प्रमुख अमोल भांबरकर, मनोहर भाकरे, अरुण खिची, दिनेश परदेशी, अंबादास गोटीपामूल आदींनी परिश्रम घेतले.

# मोठ्या आवाज डिजे वाजवल्याने मालकासह मंडळाच्या अध्यक्षावर तोफखाना पोलिसांत गुन्हा दाखल

नगर - शहरातील तोफखाना पोलीस स्टेशन अंतर्गत एका जयंती उत्सव मिरवणुकीत सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजवल्याप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. लोकमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव मिरवणूक मार्गावर हा प्रकार घडला. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी मंडळाचे अध्यक्ष आणि डीजे मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

भिस्तबाग चौक येथील पार्वती कॉर्नर समोरून ही मिरवणूक जात होती. मिरवणुकीमध्ये आरोपींनी मोठ्या आकाराची डीजे सिस्टीम लावून अत्यंत कर्णकर्कश आवाजात गाणी वाजवली. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण निर्माण झाले. तेथे बंदोबस्तावर तैनात असलेल्या पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी संबंधितांना आवाजाची मर्यादा कमी करण्याबाबत वेळोवेळी सूचना दिल्या होत्या. मात्र, आरोपींनी या शासकीय सूचनांकडे साफ दुर्लक्ष केले. त्यांनी मोठ्या आवाजात गाणी सुरूच ठेवून आवेशपूर्ण घोषणाबाजी देखील केली.

सर्वोच्च न्यायालयाने ध्वनीक्षेपकाबाबत घालून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुजय विल्यम हिवाळे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून तोफखाना पोलिसांनी मंडळाचे अध्यक्ष दादा बंडू नाबदे (रा. ताजनापूर, शेवगाव, सध्या रा. पारिजात चौक, सावेडी) आणि डीजे मालक प्रवीण बबन भोंडवे (रा. ढवळपुरी, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध पर्यावरण संरक्षण कायदा व ध्वनी प्रदूषण नियंत्रण कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार करीत आहेत.

## नामदेवराव दळवी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - आडत कांदा व्यापारी नामदेवराव सहादू दळवी (वय ८०) यांचे २ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २ जून रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुहास दळवी, रुपाली, दिपाली, वैशाली यांचे ते वडील होत.

## स्वर्णित (शशिकांत) पादीर यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील शेतकरी स्वर्णित (शशिकांत) गुलाबराव पादीर (वय ५०) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन भाऊ, दोन मुली, चुलते, पुतणे असा परिवार आहे. सेवानिवृत्त तहसीलदार गुलाबराव पादीर यांचे चिरंजीव, ॲड. सागर व आकाश पादीर यांचे बंधू होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# जागतिक सायकल दिवस निमित्त अहिल्यानगरमध्ये ७ जून रोजी विविध गटांमध्ये तसेच अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन

नगर - अहिल्यानगर येथे जागतिक सायकल दिवस निमित्त ७ जुन रोजी विविध गटांमध्ये सायकलिंग स्पर्धा तसेच'अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन पेमराज सारडा महाविद्यालय मैदानावर करण्यात आले आहे. या स्पर्धे साठी जिल्ह्यातील नामांकित महिला सायकलपटू अहिल्यानगरमध्ये दाखल होणार आहेत. ही लीग दोन गटांमध्ये होणार असून, त्यामध्ये वुमेन्स इलीट (खुला गट १९ चे पुढे) आणि वुमेन्स जूनिअर (ज्युनिअर मुली १५ ते१८, वयोगट) सब ज्युनिअर गट (वय १० ते १४ गट) या तीन प्रकारात मुली च्या सायकल स्पर्धा होतील विजेत्या खेळाडूंना मेडल्स रोख रक्कम, सर्टिफिकेट व सहभागी सर्व खेळाडूना सर्टिफिकेट देण्यात येणार आहे, तरी जिल्हातील मुलींनी सहभाग घ्यावा असे आवाहन सचिव प्रा.संजय साठे यांनी केले आहे.

महिलांना सायकलिंग खेळात प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवोदित सायकलपटूंना राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी संधी मिळवून देण्यासाठी अस्मिता खेलो इंडिया उपक्रमांतर्गत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सलग दुसऱ्या वर्षी इतक्या मोठ्या प्रमाणात महिलांसाठी सायकलिंग स्पर्धा होत आहे. तसेच हौशी पुरूषासाठी ४० कि.मी सायकल राईड, तसेच मेन्स पुरुष ४० कि.मी सायकलिंग स्पर्धा व १८ वयोगटा मध्ये २०कि.मी सायकलिंग स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे या स्पर्धेसाठी रोख बक्षीस ८०००० रुपये ठेवले आहे.

या सर्व सायकलिंग स्पर्धा पेमराज सारडा महाविद्यालय मैदानावर रविवारी सकाळी ६ वाजता स्लो झोन सुरूवात होऊन स्पर्धा पत्रकार चौक-डी एस पी चौक-स्टेट बँक चौक -चाँदनी चौक -सोल्हापुर चौक -टँक मुझीयम पासून सायकलिंग स्पर्धा सुरू होईल पुढे स्पर्धा पुरूषांच्या सायकलिंग स्पर्धा पुढे वाळुंज पासून चाँदबिबी बायपास चौकातून परत टँकर मुझीयम पर्यंत शेवट होईल.

या स्पर्धेसाठी राष्ट्रीय सायकलिंग महासंघ, खेलो इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, सायकलिंग असोसिएशन ऑफ अहिल्यानगर, ईनिफिटी सायकलिंग अँकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालयाचे विशेष सहकार्य लाभले आहे.

महिला खेळाडूनी रजिस्ट्रेशन करून सहभागी व्हावे. आवश्यक त्या सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून, सुरक्षेपासून ते वैद्यकीय सुविधा, नाष्टा जलपान व्यवस्थेपर्यंत सर्व बाबींचा काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये अहिल्यानगर मध्ये अनेक महिला व पुरुष सायकलपटू आपले कौशल्य दाखवण्यासाठी येणार असून, विजेत्यांना रोख बक्षीस, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र मिळाणार आहे

स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ६ वाजता होणार आहे. जिल्ह्यातील नागरिक, क्रीडा प्रेमींनी या स्पर्धेला उपस्थित राहून महिला सायकलपटूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्र चे सचिव प्रा.संजय साठे यांनी केले.

तसेच स्पर्धा नियोजनासाठी प्रा.साईनाथ थोरात, संभाजी मोहिते (ईनीफिटी अँकॅडमी संचालक), प्रा.संजय धोपावकर, शैलेश गवळी, जनार्धन कोळपकर, रावसाहेब बाबर, दिनेश भालेराव, अविनाश काळे, विनायक भुतकर काम पाहत आहेत. तसेच सायकलिग स्पर्धेच्या टेक्निकल संभाजी मोहीते व त्यांची टिम पाहणार आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### उन्हाळ्यात खा जांभूळ...

जांभूळ हे उन्हाळ्यात मिळणारे एक अत्यंत गुणकारी फळ आहे. आयुर्वेदात जांभळाला 'मधुमेहाचा शत्रू' म्हटले आहे कारण यातील जांबोलीन आणि जांबोसिन ही तत्वे रक्तातील साखरेचे प्रमाण प्रभावीपणे नियंत्रित करतात. जांभळाच्या बियांची पावडर तर मधुमेही रुग्णांसाठी वरदानच मानली जाते. जांभूळ पचनसंस्थेसाठी देखील उत्तम आहे. त्याच्या तुरट चवीमुळे अपचन, गॅस, आम्लपित्त यांसारखे पोटाचे विकार दूर होतात आणि भूक वाढते. तोंड आले असता जांभूळ चघळल्याने आराम मिळतो. यामध्ये लोहाचे प्रमाण भरपूर असल्याने रक्त वाढण्यास मदत होते आणि ॲनिमियासारख्या आजारावर ते गुणकारी ठरते. रक्त शुद्ध करण्याचे कामही जांभूळ करते. हृदयाच्या आरोग्यासाठी जांभूळ खूप महत्त्वाचे आहे. ते शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी करून रक्तदाब नियंत्रणात ठेवते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. व्हिटॅमिन उ आणि अँटीऑक्सिडंट्सनी समृद्ध असलेले जांभूळ शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवते आणि त्वचा निरोगी ठेवते. नियमित जांभूळ खाल्ल्याने चेहऱ्यावरील पिंपल्स, डाग कमी होऊन त्वचा तजेलदार बनते. दात आणि हिरड्यांच्या समस्येवरही जांभूळ उपयोगी आहे. त्याचा तुरटपणा हिरड्या मजबूत करतो आणि त्यातून रक्त येणे थांबवतो. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी जांभूळ एक चांगला पर्याय आहे कारण यात कॅलरी कमी आणि फायबरचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे पोट भरल्याची भावना राहते. याशिवाय जांभूळ लिव्हर डिटॉक्स करते, शरीरातील उष्णता कमी करते आणि मूत्रल असल्यामुळे किडनी स्टोनच्या त्रासातही आराम देते.अशा प्रकारे जांभूळ हे केवळ चवीपुरते नसून आरोग्यासाठी एक संपूर्ण औषधाचे भांडार आहे. मात्र ते रिकाम्या पोटी आणि जास्त प्रमाणात खाणे टाळावे, तसेच खाल्ल्यानंतर लगेच पाणी पिऊ नये.

## पाककला

### चॉकलेट संदेश

**साहित्य** : पनीर १ कप मॅश केलेले, पिठीसाखर ४ टेबल स्पून, कोको पावडर १.५, टेबलस्पून दूध पावडर १ टेबलस्पून, वेलची पावडर १/४ टीस्पून, तूप १ टीस्पून

**कृती** : पनीर एकदम मऊ मॅश करून घ्या, गुठळी नको. कढईत पनीर, पिठीसाखर, कोको पावडर, दूध पावडर एकत्र करा. मंद आचेवर ५-६ मिनिटे सतत परतत राहा. मिश्रण घट्ट होऊन कढई सोडू लागले की गॅस बंद करा. वेलची पावडर मिक्स करून कोमट होऊ द्या. हाताला तूप लावून छोटे गोळे करून आकार द्या.

ड्रायफ्रुट्स लावून ३० मिनिटे फ्रीजमध्ये सेट करा.

## वास्तू

### भिंतीचे रंग

* उत्तर भिंत - हिरवा किंवा पिस्ता रंग, करिअर वाढते.

* दक्षिण भिंत - लाल किंवा नारंगी रंग, प्रसिद्धी मिळते.

* पूर्व भिंत - पांढरा किंवा हलका निळा, आरोग्य चांगले राहते.

* पश्चिम भिंत - निळा किंवा राखाडी, लाभ होतो.

* पती-पत्नीचा फोटो बेडरूमच्या नैऋत्य भिंतीवर लावा. बेडरूममध्ये रडणाऱ्या मुलाचे, युद्धाचे हिंसक फोटो लावू नका. घरात लव्ह बर्ड्सची जोडी किंवा हंसाचे चित्र लावा.

## सौंदर्य

* एका बाऊलमध्ये कच्चे दूध घ्या. १० मिनिट हात-पाय बुडवून ठेवा. मग त्याच दुधाने मसाज करा. लॅक्टिक ॲसिड डेड स्किन काढते. पार्लरचा मॅनिक्युअर-पेडिक्युअर घरीच होईल.

* कोरफडीचा गर मिक्सरमध्ये वाटून आईस ट्रे मध्ये फ्रीझ करा. रोज संध्याकाळी १ क्यूबने हात-पायावर मसाज करा. टॅनिंग, रॅशेस कमी होतात आणि थंडावा मिळतो.

## सल्ला

ट्रॉलीच्या तळाला जुना पेपर किंवा प्लास्टिक शीट अंथरा. साफ करायला सोपे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ४ जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ कृष्णपक्ष, उ.षा. २७।४२, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : कामात नवीन जोश येईल, अडलेली कामे मार्गी लागतील. आर्थिक लाभाचे योग.

**वृषभ** : कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील, जुन्या मित्रांची भेट होईल. पैशाची गुंतवणूक फायदेशीर ठरेल. वाद टाळा.

**मिथुन** : प्रवासाचे योग आहेत, नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. नोकरी-व्यवसायात प्रगती होईल.

**कर्क** : घरात सुख-समृद्धी नांदेल, मनातील इच्छा पूर्ण होतील. खर्च वाढेल पण काळजी नको.

**सिंह** : तुमचे वर्चस्व वाढेल, लोक तुमचे ऐकतील. स्पर्धेत यश मिळेल, मान-सन्मान वाढेल. रागावर नियंत्रण ठेवा.

**कन्या** : नियोजन केलेली कामे पूर्ण होतील, अभ्यासात यश मिळेल. छोट्या प्रवासाचे योग. आरोग्य उत्तम राहील.

**तूळ** : जोडीदारासोबत वेळ चांगला जाईल, नाती मजबूत होतील.

**वृश्चिक** : धाडसी निर्णय फायदेशीर ठरतील, शत्रूवर मात कराल. अचानक धनलाभ होऊ शकतो.

**धनु** : धार्मिक कार्यात मन लागेल, मनाला शांती मिळेल. नोकरीत बदलाचे संकेत आहेत. मुलांकडून आनंदाची बातमी.


**मकर** : मेहनतीचे फळ मिळेल, वरिष्ठ खूश होतील. जमीन-घराचे व्यवहार जुळतील. थकवा जाणवेल.

**कुंभ** : मित्रांची मदत मिळेल, सामाजिक कामात नाव होईल. नवीन कल्पना सुचतील. पैसा जपून वापरा.

**मीन** : कलेत, सर्जनशील कामात यश मिळेल, मन प्रसन्न राहील. प्रेमसंबंधात गोडवा वाढेल. पोटाचे विकार जपा.

# शब्दगंध क्र. ७४४४

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) हेतू; आशय; मनीषा; मनोगत ४) बस्तान ६) धोबी; परीट ८) पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र १०) पिकांवर पडणारा एक रोग ११) राजस्थानातील एक भाग जेथील लोक व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत १२) करमणूक १४) धीराचा; निश्चयाचा; धैर्यवान १५) रबरापासून बनविलेले १७) अंकुर; कोंब; फुटकीतुटकी भांडी; पराजय १८) ठरलेले २०) न्हावी; नाभिक २२) मनसब धारण करणारा

**उभे शब्द :-** १) एक प्रकारचे रत्न २) झाडावर चढून व काठी फेकून खेळण्याचा एक क्रीडा प्रकार ३) खाट; पलंग ५) एक सुगंधी वनस्पती ७) धनुष्य; धनुष्याकृतीचे बांधकाम; महिरप ९) किल्ल्यावरचा पहारेकरी; किल्लेदार १३) अगदी जख्खड म्हातारा १४) तुकडा; अनेक देशांचा समुच्चय १५) आठवड्यातील सुट्टीचा दिवस १६) एक प्राणी; अज; शेळी १७) अभियान १९) गावाचे प्रवेशद्वार २१) मेहनत; श्रम

### शब्दगंध क्र. ७४४३ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : ताकद कमी असली तरी धैर्य आणि बुद्धी मोठी असेल तर काहीही अशक्य नाही.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## आरसा नसता तर माणसाला तो कसा दिसतो हे कधीच कळलं नसतं का?

आरसा नसता तरी माणसाला तो कसा दिसतो हे नक्कीच कळलं असतं, कारण आरसा हे स्वतःला पाहण्याचं एकमेव साधन नाही. माणसाने काचेचा आरसा शोधण्याच्या हजारो वर्षे आधीपासून तो स्वतःचं प्रतिबिंब बघत होता. निसर्गाने त्याला पहिला आरसा दिला तो म्हणजे शांत, स्थिर पाणी. डबक्यात, तलावात किंवा पाणी भरलेल्या मातीच्या भांड्यात वाकून पाहिलं की आपला चेहरा दिसतो. प्राचीन काळातल्या माणसाने, शिकाऱ्याने, शेतकऱ्याने पहिल्यांदा स्वतःला अशाच पाण्यात पाहिलं असेल. त्यावरूनच त्याला नाक, डोळे, तोंड यांची कल्पना आली असेल.

काचेचा आरसा येण्यापूर्वी माणसाने धातू घासून गुळगुळीत करायला शिकला. आठ हजार वर्षांपूर्वी तुर्कस्तानमध्ये ऑब्सिडियन दगड पॉलिश करून आरसा बनवला होता. नंतर इजिप्त, मेसोपोटेमियामध्ये लोक तांब्याच्या, काशाच्या ताटांना इतकं घासायचे की त्यात चेहरा दिसेल. श्रीमंत लोक चांदीचे आरसे वापरत. म्हणजे काचेचा आधुनिक आरसा १८३५ साली आला, पण त्याआधी ७-८ हजार वर्षे माणूस स्वतःला पाहत होता. आरसा नसता तरी हे धातूचे आरसे राहिलेच असते. याशिवाय दुसऱ्याचे डोळे हा पण एक नैसर्गिक आरसाच आहे. तुम्ही कधी लहान बाळाला त्याच्या आईच्या डोळ्यात पाहताना बघितलं आहे का? डोळ्याच्या बाहुलीत आपली छोटीशी, उलटी प्रतिमा दिसते. आरसा नसता तर लोक एकमेकांच्या डोळ्यात बघूनच तू कसा दिसतोस ते सांगत राहिले असते. शिवाय स्पर्शाची भाषा आहेच. आंधळी व्यक्ती स्वतःचा चेहरा हाताने चाचपून बघते आणि इतर लोक तिचं वर्णन करतात. तुझे केस कुरळे आहेत, तुझं हसू छान आहे. समाजात एकमेकांचं वर्णन करण्याची पद्धत वाढली असती.

कॅमेराचा शोध आरशाच्या आधी लागला. १८१६ साली पहिला फोटो काढला गेला. म्हणजे आरसा नसता तरी २०० वर्षांपूर्वी फोटोमुळे माणसाला तो कसा दिसतो हे अचूकपणे कळलं असतं. आज तर मोबाईलचा फ्रंट कॅमेरा आरशापेक्षा जास्त वापरला जातो. सेल्फीच्या जमान्यात आरशाची गरज कमीच झाली आहे. पण आरसा नसता तर एक मोठा फरक पडला असता. आरशामुळे आपल्याला सेल्फ अवेअरनेस म्हणजे स्वतःची जाणीव ताबडतोब होते. केस विस्कटले आहेत का, शर्टची कॉलर बरोबर आहे का, हे आपण सेकंदात बघतो आणि सुधारतो. आरसा नसता तर आपण पूर्णपणे इतरांच्या मतावर अवलंबून राहिलो असतो. त्यामुळे कदाचित माणूस बाहेरच्या दिसण्यापेक्षा स्वभावाला, गुणांना जास्त महत्त्व द्यायला लागला असता.

मेकअप, पार्लर, फॅशन इंडस्ट्री आज इतकी मोठी झाली नसती. प्राणीही आरशात स्वतःला ओळखतात का यावर मिरर टेस्ट घेतला जातो. हत्ती, डॉल्फिन, मॅगपाय पक्षी, चिंपांझी आरशात पाहून त्यांच्या अंगावर लावलेला डाग हाताने पुसतात. म्हणजे त्यांना कळतं की तो मीच आहे. आरशाने माणसाची ही मी ची जाणीव खूप प्रखर केली.

शेवटी सांगायचं तर, आरसा हे फक्त एक साधन आहे. ते नसतं तर दुसरं काहीतरी निघालंच असतं. माणूस इतका कल्पक प्राणी आहे की त्याने स्वतःला बघण्याचा मार्ग शोधून काढलाच असता. फक्त तो थोडा उशिरा कळला असता आणि आपण दिसण्याबाबत एवढे जागरूक नसतो. कदाचित ते बरंच झालं असतं, कारण मग आतलं सौंदर्य जास्त महत्त्वाचं ठरलं असतं.

## वेळेची किंमत

एकदा एक गरीब लाकूडतोड्या डोंगरात लाकडं तोडायला गेला. दिवसभर मेहनत करून संध्याकाळी तो गावाकडे निघाला. वाटेत त्याला एक म्हातारा साधू भेटला. साधूने त्याला एक छोटीशी वाळूची घड्याळी दिली आणि म्हणाला, बाळा, या घड्याळीतली वाळू संपेपर्यंत तू जे काही मागशील ते तुला मिळेल. पण लक्षात ठेव, एकदा वाळू संपली की परत संधी नाही. लाकूडतोड्याला आनंद झाला. तो घरी आला आणि विचार करू लागला. आधी महाल मागावा, मग सोनं, मग गावाचं राज्य. पण काय मागावं हेच त्याला सुचेना. उद्या सकाळी निवांत विचार करून मागू असं म्हणून त्याने घड्याळी उशीजवळ ठेवली आणि झोपला.

सकाळी उठून पाहतो तर निम्मी वाळू खाली सरकली होती. तो घाबरला. आता तर नक्की काय मागायचं ते ठरवायला हवं. त्याने यादी करायला सुरुवात केली. एवढ्यात शेजारचा मित्र आला, गप्पा मारता मारता दुपार झाली. दुपारी जेवण झाल्यावर जरा वामकुक्षी घ्यावी म्हणून आडवा झाला. संध्याकाळी जाग आली तेव्हा घड्याळीत फक्त मूठभर वाळू शिल्लक होती. आता तर त्याच्या पोटात भीतीचा गोळा आला. त्याने घाईघाईने मला श्रीमंत कर असं म्हटलं. त्याक्षणी झोपडीचं सोन्याच्या महालात रूपांतर झालं. पण वाळूचा शेवटचा कण खाली पडला आणि घड्याळी थांबली.

महाल मिळाला पण त्यात तो एकटाच होता. बायको, मुलं त्याला ओळखेनाशी झाली कारण त्यांच्यासाठी त्याने काहीच मागितलं नव्हतं. गावातली माणसं त्याला घाबरू लागली. श्रीमंती होती पण सोबत जेवायला, बोलायला कुणीच नव्हतं. तेव्हा त्याला साधूचे शब्द आठवले. वेळेची वाळू एकदा सरली की परत येत नाही. तो महाल सोडून रडत रडत साधूकडे गेला.

साधू हसून म्हणाला, बाळा, मी तुला संपत्तीची घड्याळी दिली नव्हती, आयुष्याची दिली होती. आपल्याकडे रोजचा दिवस म्हणजेच ती वाळूची घड्याळी असते. 'उद्या करू' म्हणत आपण आजचा वेळ वाया घालवतो आणि शेवटी हातात पश्चाताप राहतो.

बोध : वेळ सगळ्यात मोठी संपत्ती आहे. ती थांबत नाही आणि परत येत नाही. म्हणून जे करायचं ते आजच करा. कुटुंबाला वेळ द्या, स्वप्नांसाठी पाऊल उचला. कारण उद्या कधीच येत नाही, तो आला की त्याचा आज झालेला असतो.



# जीवन का अमृत (भाग १)

## संसार के अंत तक

जो भी आपकी आंतरिक उन्नति में बाधा डाल सकता है, वह १ कुछ आपके हित में नहीं होगा ।

अगर आपको किसी कार्य से भारत आने का मौका मिले और आप मेरे पास आ सकें, तो मैं आपको देखकर खुश होऊँगा ! व्यक्तिगत वातावरण का असर बहुत अधिक होता है। हालाँकि यह सच है, पर सतुरु समय और स्थान की सीमाओं में बँधा नहीं होता। वह सदा आपके साथ है, चाहे वह हजारों ही मील दूर क्यों न हो। कृपया उसकी दया को ग्रहण करना सीखें, उसकी दयालु उपस्थिति को महसूस करें, आपके साथ बस में चलते

हुए, गलियों में आपसे बातें करते हुए, आपके साथ बगीचे में बैठे हुए, आपके दफ्तर की मेज के पास और हर सुबह आपके साथ दफ्तर जाते हुए, तालाब के पास ठहरे नए फूलों को निहारते हुए और शाम को सारे रास्ते आपके साथ पैदल वापिस आते हुए।

सतुरु सदा शिष्य के साथ है और उसे संसार के अंत तक, कभी भी नहीं छोड़ेगा। पिता कभी भी अपने बच्चों को अस्वीकर नहीं करेगा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

## इतरांना बदला

करतो आणि कशी प्रतिक्रिया देतो त्याची जबाबदारी आपलीच आहे. समजा, मी तुमचा अपमान केला आणि तुम्हाला दुःख झालं. तर मग तुम्ही मला बदलायचा प्रयत्न करणं हा तुमच्याकडे असलेला एक पर्याय आहे. तुम्ही मला सांगाल की मी तुम्ही स्वतःला सांगाल, अशा पद्धतीने बोलायला नको होतं. दुसरा पर्याय असा

मी असा विचार करायला नको होता. यातला कोणता पर्याय सोपा आहे ?

सुरेश ओबेरॉय :

स्वतःत बदल करणं.

शिवानीदीदी :

दोन्ही पर्यायांपैकी काय करणं शक्य आहे हे खूप महत्त्वाचं आहे.

सुरेश ओबेरॉय : स्वत:वर काम करणं.

शिवानीदीदी पण आपण दिवसभर काय करत राहतो? इतरांना बदलायचा प्रयत्न. आपली ऊर्जा शोषून घेण्याचा हा सोपा मार्ग आहे. कारण हे कधीच शक्य नाहीये. आपल्याला छान वाटावं म्हणून इतरांनी बदललं पाहिजे असा विचार आपण करतो. पण ते बदलत नाहीत. आणि आपण दुःखातच राहतो. हे असं आयुष्यभर चालू राहू शकतं.

भूमिकेच्या स्मृतीपासून आत्मिक स्मृतीकडे

सुरेश ओबेरॉय : नवराबायको एकमेकांच्या बदलण्याची वाट बघत बसतात आणि

त्याची परिणती घटस्फोटात होते.

शिवानीदीदी : म्हणून, आजपासून मी कोणालाही दोष देणार नाही आणि कोणावरही

टीका करणार नाही असं ठरवू या.

सुरेश ओबेरॉय : हे सगळ आपण आयुष्यात अनेकदा ऐकलेलं असतं, पण प्रत्यक्षात तसं वागणं जमत नाही. दगडांच्या देशातल्या मऊ पायांच्या राजकन्येची गोष्ट आपण ऐकली असेल. तिच्या पायाला दुखापत होऊ नये म्हणून देशात सगळीकडे गालिचे घालायचे आदेश राजाने दिले. पण राजकन्येने पायात चप्पल घालणं हा खरं तर सोपा उपाय होता.

शिवानीदीदी :

हो बरोबर. आपल्याला दुखापत होऊ नये म्हणून सगळीकडे गालिचे अंथरले जावेत, अशी आपली इच्छा असते. पण हे आपण किती दिवस करणार? तेव्हा कितीही खडतर रस्त्यांवरून चालायला लागलं तरी चालेल; त्यासाठी स्वतःला सुरक्षित करणं हा सर्वांत सोपा उपाय आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, मी मेल्यावर तुम्ही दुसरं लग्न कराल का?

नवरा : वेडी आहेस का? तू जिवंत असतानाच माझं लग्न झाल्यासारखं वाटतं... दुसरं करून काय मरायचंय!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्रातील पहिले जागतिक वारसा स्थळ कोणते?

- अजिंठा लेणी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## टोमॅटो

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार :

टोमॅटो हे अग्निप्रदीपक, दीपक, पाचक, सारक, रक्तशोधक, मधुर, आम्ल गुणात्मक, रुचकर, हृदय, लघु, स्निग्ध व उष्ण वीर्यात्मक आहे. टोमॅटोमध्ये कमी उष्मांक असल्यामुळे मधुमेहींसाठी, हृदयरुग्णांसाठी एक वरदानच आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस 'अ', 'ब' व 'क' जीवनसत्त्वे, प्रथिने, आर्द्रता, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ अशा सर्व घटकांनी टोमॅटो परिपूर्ण आहे.

उपयोग :

१) आहारामध्ये टोमॅटो हा उत्तम औषधी गुणयुक्त आहारीय पदार्थ आहे. टोमॅटोची भाजी, रस काढून सूप, तर जेवणामध्ये टोमॅटो कोशिंबीर, सॅलड अशा अनेकविध प्रकाराने टोमॅटो वापरण्यात येतो.

२) टोमॅटोमध्ये उष्मांकाचे प्रमाण, तसेच कर्बोदकाचे प्रमाण अत्यंत कमी असल्यामुळे रक्तदाब, हायकोलेस्टेरॉल, हृदयविकार, मधुमेह या विकारांमध्ये टोमॅटोचा औषधासारखा वापर करता येतो. वरील विकार असणाऱ्यांनी टोमॅटो नियमितपणे आहारात वापरावा.

३) अति वजन असणाऱ्या व्यक्तींनी वजन कमी करण्यासाठी आहारामध्ये नियमितपणे टोमॅटोचे सेवन करावे. टोमॅटो खाल्ल्याने पोट भरल्याची भावना निर्माण होते व त्यामध्ये कमी उष्मांक असल्याने वजन कमी होण्यास मदत होते.

४) टोमॅटोमध्ये 'अ' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असल्याने रातआंधळेपणा, दृष्टिदोष या विकारांवर टोमॅटो उपयुक्त आहे. हा दोष असणाऱ्या व्यक्तीने जेवणामध्ये रोज एक टोमॅटो नियमितपणे खावा, तसेच टोमॅटोची मूठभर पाने कुस्करून एक लिटर पाण्यात उकळावी व हे पाणी दिवसातून तीन वेळा जेवणापूर्वी अर्धा कप प्यावे. यामुळे दृष्टीला तेज प्राप्त होते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००





इस्कॉनचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याच्या सांगतेप्रसंगी श्रीकृष्णलिला सादर करण्यात आली. शेजारील छायाचित्रात उपस्थित असलेले भाविक.

# अधिक महिन्यात भागवत कथेचे केलेले आयोजन भाविकांची भक्ती भावना अधिक वृध्दिंगत करणारे

## आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन, इस्कॉनच्या श्रीमद् भागवत कथा सोहळ्याची सांगता

नगर – इस्कॉनने अधिक महिन्याचे औचित्य साधून भागवत कथेचे केलेले आयोजन भाविकांची भक्ती भावना अधिक वृध्दिंगत करणारे ठरले आहे, असे प्रतिपादन आ.संग्रामभैय्या जगताप यांनी केले.



येथील नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये इस्कॉनचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याच्या सांगतेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी श्रीमती पार्वतीबाई अरूणकाका जगताप, इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास, वैष्णवतोष्णी दास, डॉ.सतीश फाटके, डॉ.सौ.अंजली फाटके, सौ.वंदना कानडे, सौ.मिना रोहित जग्गड, सौ.सोनाली चवंडके, मिलिंद चवंडके, अशोक कानडे, मदन कांबळे, मदन थोरात, गणेश पलंगे, बापू ठाणगे, मगनभाई पटेल यांच्यासह स्त्री–पुरूष भाविक उपस्थित होते.

ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास पुढे म्हणाले, श्रीमद् भागवत कथेची सांगता होताना साक्षात भगवान श्रीकृष्ण आपल्या जवळ आलेले असतात. भगवान श्रीकृष्णाची कथा आणि श्रीकृष्णाचे नाम श्रीकृष्णापर्यंत पोहोचवणारे सगळ्यात मोठे साधन आहे. श्रीकृष्णाचे प्रगट धाम असलेल्या वृंदावनात नित्य निरंतर श्रीकृष्ण लिला आजही सुरूच आहेत. कृष्ण भावनेने आपल्या घरातही वृंदावन निर्माण होते. रावण आणि कंसासारख्या अहंकारी व्यक्तीला भगवंताचे दर्शन होत नाही. जन्म–मृत्यू आपल्या हातात नाही तरीही मीपणा जात नाही.

आपल्याला प्रत्येक क्षणी आठवण राहिली पाहिजे की, आपला श्वास सुरू आहे. आपले हात–पाय हालत आहेत. आपण बोलत आहोत. आपणास ऐकू येतेय, ही सर्व भगवान श्रीकृष्णाचीच कृपा आहे.

आज घरात होम थिएटरचा टिव्ही सेट, शाही सोफा सेट अशा अत्याधुनिक सुखवस्तूची उत्तमोत्तम साधने उपलब्ध असूनही जीवन अपसेट आहे. ताजमहालसारखा देखणा बंगला उभारला पण घमेंड आणि मीपणा असेल तर त्या बंगल्यात भगवान श्रीकृष्ण येणारच नाहीत. आपण बासरी सारखे जेव्हा खुले राहू तेव्हा श्रीकृष्ण त्यात सूर भरतील.

श्रीकृष्णाचे गवळी सवंगडी स्वतःला श्रीकृष्णांच्या स्वाधीन कसे करायचे? हे आपल्याला दाखवून देतात. शरणागत भावाने श्रीकृष्णावर विश्वास ठेवला की श्रीकृष्णाला अशा भक्तांसाठी धावत यावेच लागते. भगवंत भावाचा भुकेला आहे. आपण भगवंताकडे एक पाऊल टाकले तर भगवंत शंभर पाऊले पुढे येतात. अघासूर या राक्षसाला सायुज्य मुक्ती म्हणजे भगवंताच्या शरिरात विलीन होण्याचे भाग्य लाभले. आपण नामस्मरणाच्या बळावर भगवंतापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करून या जन्माचे सार्थक करून घ्यावे, असे आवाहन श्रीमान रेवतीनंदन दास यांनी केले.

यश गोडसे याने श्रीकृष्ण रुपात आणि गायत्री माणिक हिने रुक्मिणी रुपात कथा स्थळी केलेला प्रवेश उपस्थितांचा उत्साह वृध्दिंगत करणारा ठरला. विविध फुलांची पुष्पवृष्टी आणि जयजयकार करत या श्रीकृष्ण – रुक्मिणीचे स्वागत करण्यात आले. महाआरती आणि महाप्रसादाने भक्तीपूर्ण वातावरणात या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## त्याला अज्ञानाचे ज्ञान, तोच सज्ञान




संकलन: दिशान फिचर्स

खरे तर तोंड स्वाधीन आहे प्रत्येकाच्या पण माणूस अधीन आहे. बडबडण्याच्या, नाही ना काही ठाऊक त्यातले? मग रहावे चूप, पण माणूस जातो दाखवायला नसता हुशारी आणि घेतो पाडून दगड पायावर. मौन खर तर अज्ञान झाकाल. अडाण्याने शहाण्यांमध्ये बोलणे म्हणजे स्वतःचे नाक कापून घेणे. अडाण्याला मौन हे देवाचेच देणे. पण त्याला नाही आवडत चूप बसणे.

एकदा वसंत ऋतू आला. कोकिळेला कंठ फुटला. बागेत फिरणाऱ्याच्या कानावर मधूर सुरांचा जणू वर्षाव झाला. जो तो कोकिळेच्या कूजनाचं कौतुक करू लागला. जवळच्याच तळ्यात होते बेडूक. एकाला वाटला कोकिळेचा हेवा. माझ्याजवळ नाही का स्वरांचा ठेवा ? तो बेडूक दुसऱ्याला म्हणाला. पण दुसऱ्याने सांगितले त्याला मौन राखायला. पहिला म्हणाला, कोकिळेची तान, त्याच्यावर मी करीन ताण. कोकिळेच्या सुरात त्याने मिसळला सूर. आपला बागेत फिरणारे चिडले आणि बेडकावर दगड मारू लागले. बडबडणाऱ्या बेडकाचे प्राण गेले. मौन बाळगून होते, ते सुखरूप पाहिले म्हणून म्हणतात की ज्याला आपला अज्ञानाचे ज्ञान तोच खरा सज्ञान, त्याचेच सुखरूप राहतात प्राण.

असले मौन न राखणारे अर्धवट हळकुंडाने पिवळे झालेले असतात. अज्ञानाचाच त्यांना गर्व असतो. कुणी हिताचे सांगितले तर ते चिडतात. अज्ञान घालवू पाहणाऱ्यावरच उलटतात.

एकदा हिवाळा आला. कडक थंडी पडली. जंगलात वानरांना हुडहुडी भरली. थंडीपासून बचाव करायला ती सैरावैरा धावत सुटली. मध्येच दिसले गुंजेचे झाड, लाल गुंजा पडल्या होत्या जमिनीवर. अडाणी वानरांना ती वाटली अग्नीची स्फुलिंगे, लागले ते त्या गुंजांवर जोरजोराने फुंकर घालायला.

तेवढ्यात झाडावरचा पक्षी खाली उतरला. तो शहाणा, ज्ञानी. त्याला ठाउक होते. या आहेत गुंजा. वानरांचे श्रम वाया जात आहेत, हे त्याला पाहवले नाही. तो पक्षी त्यांना म्हणाला, हे काय करता ? फुकट श्रम वाया घालवता? वानरे म्हणाली, चूप बैस रे अडाण्या. आम्ही हे अग्नीचे कण फुंकरीनं फुलवतोय. थंडी घालवायला दुसरं साधन आहे कुठं ? पक्षी म्हणाला, खरंच रे तुम्ही अडाणीच. अरे, हे अग्निकण नाहीत. ही आहेत गुंजेची फळं. वानराना आपलं अज्ञान दाखवणाऱ्या त्या पक्षाचा राग आला. त्यांनी त्याला संतापाने म ारायचा पवित्रा घेतला. पक्षी उडून गेला. पण इकडे फुंकर घालून घालून, छाती फुटून एक वानर मरण पावला. दयाळनाथ म्हणतात, येथे अडाणी म्हणजे अर्धवट ज्ञानी ज्ञान अजिबातच नसले, त्याला काही सांगणे कळेल. कोऱ्या पाटीवर रेष उमटेल. पण नुसत्या रेघोट्या ओढण्याने मळलेल्या पाटीवर फक्त लेखणी चालेल. अक्षराचे निशाणही नसेल. मग पंडितांच्या केवळ पाटी मळविणारा काय शिकेल? पण अर्धवट ज्ञान बाळगून सभेत जाणाऱ्यांना हे कोण समजावेल ?

– किशोर गांधी

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अहिल्यानगरच्या आयएमएससीडीआरला 'ट्रस्टेड व्हिजनरी कॉलेज ऑफ द ईयर २०२६' पुरस्कार

नगर – बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अॅण्ड रिसर्च (आय.एम.एस.सी.डी.आर.) या संस्थेची India Elite Education Institutional Excellence Awards Conference 2026 - National Edition साठी निवड झाली असून, संस्थेला Trusted Visionary Business Management Studies College of the Year 2026 - Maharashtra Award या राज्यस्तरीय मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

संस्थेचा शैक्षणिक व प्रशासकीय दर्जा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्कृष्ट प्लेसमेंट्स तसेच आधुनिक पायाभूत सुविधांची दखल घेत परीक्षक समितीने आय.एम.एस.सी. डी.आर.ची निवड केली. Quality Education, Excellent Administration, Placements Infrastructure या श्रेणीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा २९ मे रोजी बंगळुरू येथील 'ताज वेस्ट एन्ड' हॉटेलमध्ये पार पडला.

या पुरस्कारासाठी संस्थांचे विविध निकषांच्या आधारे मूल्यमापन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धती, अनुभवी व संशोधनाभिमुख प्राध्यापकवर्ग, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, कौशल्यविकासासाठीचे प्रशिक्षण उपक्रम, प्लेसमेंटची गुणवत्ता, आधुनिक सुविधा, प्रभावी प्रशासन, संशोधन व नवोपक्रमांना प्रोत्साहन तसेच बदलत्या शैक्षणिक व तांत्रिक प्रवाहाशी जुळवून घेण्याची क्षमता यांचा समावेश होता.



गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अहिल्यानगरच्या आयएमएससीडीआरला 'ट्रस्टेड व्हिजनरी कॉलेज ऑफ द ईयर २०२६' पुरस्कार मिळाला.

NAAC पुनर्मानांकित असलेल्या आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये एमबीए, एमसीए, बीबीए, बीसीए यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच विविध कौशल्याधारित आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. आधुनिक डिजिटल वर्गखोल्या, सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, उद्योगसंलग्न उपक्रम आणि प्रभावी प्लेसमेंट सहाय्य यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध होत आहेत.

संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता आणि उपसंचालक डॉ. विक्रम बार्नाबस यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. तसेच या पुरस्कारासाठी झालेल्या बी–स्कूल सर्व्हे सहभागाचे समन्वय कार्य प्रा. गौरी पाटील यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.

या राष्ट्रीय सन्मानाबद्दल बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नाबस आणि सचिव विशाल बार्नाबस यांनी संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नाबस तसेच आय.एम.एस.सी.डी.आर.मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार संस्थेच्या सामूहिक प्रयत्नांचे आणि शैक्षणिक उत्कृष्टतेच्या सातत्यपूर्ण वाटचालीचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.



साईदीपसह्याद्री हॉस्पिटल येथे कृत्रिम दंत प्रत्यरोपण अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

# कृत्रिम दंत प्रत्यरोपण अभ्यासक्रम यशस्वी : डॉ. पायल धूत

नगर – भारती विद्यापीठ पुणे अंतर्गत स्वीटझरलँड येथील नोबल बायोकेअर संस्थेद्वारे आयोजित अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला देशातून काही निवडक दंतरोपण तज्ञांनी यामध्ये भाग घेतला होता.

साईदीपसह्याद्री हॉस्पिटल येथे दंत विकार तज्ञ म्हणून गेली ७ वर्ष विविध दंत विकार रुग्णांवर यशस्वी उपचार केले असून अत्याधुनिक पद्धतीने दंत रोपण हे अभ्यासक्रम नुकतेच पूर्ण केले डॉ. कानिर भाटिया यांनी मार्गदर्शन केले, त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारले.

चेअरमन डॉ. दीपक एस एस, डॉ. आर. आर. धूत, डॉ. रवींद्र सोमाणी, डॉ. कैलास झालानी व सर्व जेष्ठ संचालक डॉक्टर्स यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते. यांच्या दूरदृष्टीमुळे हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक दंत विकार विभाग कार्यरत असून डॉ. रोहित धूत यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत अनेक कृतिम दंत रोपण शस्त्रक्रिया पूर्ण केल्या आहेत, असे सांगून डॉ. पायल धूत यांनी यापुढे या अभ्यासक्रमामुळे आधुनिक पद्धतीने दंत रोपण करण्यास मदत मिळणार आहे.

# इंटिरियर डिझाईनर असोसिएशनतर्फे वर्ल्ड इंटिरियर दिवस उत्साहात

नगर – इंटिरियर डिझाईनर असोसिएशन, अहिल्यानगर संस्थेच्या सर्व इंटिरियर डिझाईनर्सतर्फे वर्ल्ड इंटिरियर दिवस (३० मे) उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जनकल्याण रक्तपेढी येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी सावेडीतील हॅाटेल संजोग येथे या समारंभाकरिता पुणे येथील इंटिरियर डिझायनर सुधीर पवार यांना विशेषतः आमंत्रित करण्यात आले.




इंटिरियर डिझाईनर असोसिएशनतर्फे वर्ल्ड इंटिरियर दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

अहिल्यानगरमधील आर्किटेक प्रल्हाद जोशी या दोघांचाही इंटिरियर वर्क प्रेझेंटेशन आयोजित करण्यात आले होते, कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रमुख अतिथी यांचे प्रेझेंटेशन झाले व तदनंतर प्रयोजकांचे व्यवसायाबद्दलच्या प्रमुख गोष्टींबद्दल माहिती दिली. यानंतर संस्थेचे सभासदांच्या उपस्थितीत संस्थेचे पदाधिकारी व प्रमुख अतिथी यांनी मिळून वर्ल्ड इंटिरियर दिवसानिमित्त केक कापून साजरा करण्यात आला.

कार्यक्रम स्थळी अहिल्यानगर– इंटिरियर डिझाईनर असोसिएशन संस्थेचे अध्यक्ष सागर कंदूर, सचिव व्रजेश शहा, खजिनदार अंकुर सुपेकर, उपाध्यक्ष उमेश जाजू व संपूर्ण संचालक मंडळ व तसेच इतर सभासद चंद्रकांत तागड, अमोल खोले, चेतन वाडेकर, प्रविण पडवळ, रोहित लोटके, श्वेता मुळे, अलका बलदवा, कल्पना गांधी, सचिन हिवाळे, विशाल मुसळे, प्रल्हाद जोशी, तुषार भांबरे, अजय दगडे, विनायक गोसके, राकेश गांधी, किरण बडवे उपस्थित होते.

संस्थेचे सहसचिव कृणाल बुरगुल यांनी आभार मानले. संस्थेचे अमोल खोले, उमेश जाजू, विशाल दगडे, कृणाल बुरगुल, राहुल बजाज, घनश्याम पित्रोडा, अमित कुकरेजा, सतीश बजाज आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# 'जागतिक पर्यावरण दिना'निमित्त ५ जूनला राळेगण सिद्धी येथे 'राज्यस्तरीय कार्यशाळेचें' आयोजन

नगर – 'जागतिक पर्यावरण दिना'चे औचित्य साधून आणि वृक्षमित्र स्व. आबासाहेब मोरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ५ जून रोजी राळेगण सिद्धी (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथे 'राज्यस्तरीय एकदिवसीय कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला पद्मभूषण अण्णा हजारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित केली आहे.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी राज्य पर्यावरण कोअर कमिटीचे सदस्य बाळासाहेब डोंगरे (राहुरी), डॉ. दादासाहेब जबरे (अहिल्यानगर), प्रा. महेश पाडेकर (अकोले), संजय गायकवाड (श्रीगोंदा), डॉ. नानासाहेब गोफणे (बारामती), प्रा. चंद्रकांत भोजने (कोंडापुरी), राजकुमार गिरी (पुणे), मदन राजपूत (अहिल्यानगर), सोपानराव वायाळ(आळंदी) आणि डॉ. प्रा. बबन जाधव (मुंबई) कार्यरत आहेत.

नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क – प्रमोद मोरे (राज्याध्यक्ष, निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य) – ८९९९५३३६८३.



उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमे अंतर्गत एक वर्ष – एक लाख वृक्ष या महत्त्वाकांक्षी पर्यावरण संवर्धन उपक्रमाचा भाग म्हणून श्रीरामकृष्ण शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम झाला.

# ग्रीन सिटी अभियानांतर्गत श्रीरामकृष्ण शाळेत वृक्षारोपण

नगर – उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमे अंतर्गत एक वर्ष – एक लाख वृक्ष या महत्त्वाकांक्षी पर्यावरण संवर्धन उपक्रमाचा भाग म्हणून श्रीरामकृष्ण शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम झाला.

पर्यावरण संरक्षण, हरित परिसर निर्मिती आणि भावी पिढ्यांना स्वच्छ व निरोगी पर्यावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत एक लाख वृक्ष लागवड व संवर्धनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. याच उपक्रमांतर्गत श्रीरामकृष्ण शाळेत ८ ते ९ फूट उंचीची ४५ देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले. या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी शाळा प्रशासनाने स्वीकारली आहे.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा तसेच अॅड. व इंजि. कैलाश दिघे यांचा शाळेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रीन सिटी अभियानाचे महापालिका प्रतिनिधी व उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, प्रा. हर्षल आगळे आणि प्रताप काळे यांचीही विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे अध्यक्ष नंदकुमार झवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, उपाध्यक्ष राजेश झवर, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, कार्यकारी समिती सदस्य रवींद्र गुजराथी, मधुसूदन सारडा, लक्ष्मीकांत झवर, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद उपस्थित होते.

यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. ग्रीन सिटी अभियानात अधिकाधिक युवक, महिला मंडळे, संस्था, संघटना, कंपन्या, उद्योजक आणि विविध आस्थापनांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन ग्रीन सिटी मोहिमेचे कोअर कमिटी सदस्य कैलाश दिघे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला.

# कापूरवाडी तलाव परिसरात 'वड'राईमध्ये ५ जून रोजी पर्यावरण परिषदेचे आयोजन

नगर – जागतिक पर्यावरणदिनाचे औचित्य साधून आत्मनिर्धार फाउंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्या पुढाकारातून अहिल्यानगर जिल्ह्यातील कापूरवाडी तलाव परिसरात 'वड' राईमध्ये 'पर्यावरण परिषद' आयोजित करण्यात आली आहे. ५ जून रोजी सकाळी ७ वाजता परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी दिली. गतवर्षी ५ जूनला पहिली ग्रामीण पर्यावरण परिषद इसळक लिंगतीर्थ येथे घेण्यात आली होती. यंदाचे हे दुसरे वर्ष आहे.

या परिषदेचे उद्घाटन नुकतीच युपीएससीतून आय.आर. एस. अधिकारी म्हणून निवड झालेले ओंकार खुंटाळे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जगन्नाथ भोर भूषविणार आहेत. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे भूजल माहिती केंद्राचे समन्वयक भूवैज्ञानिक अजिंक्य काटकर आणि निसर्गप्रेमी महंत बाल ब्रम्हचारी शिवदत्त महाराज, वृंदावन आश्रम, शहापूर मार्गदर्शन करतील.

या परिषदेतून अहिल्यानगर जिल्ह्यातील पर्यावरणप्रेमी, संस्था, कार्यकर्ते आणि नागरिकांना एकत्र आणून एक सक्षम नागरी संघटना स्थापन करण्याचा मानस अरण्य फाउंडेशनचे अमित गायकवाड यांनी व्यक्त केला आहे. तरी या परिषदेसाठी अधिकाधिक पर्यावरणप्रेमींनी एकत्र यावे, असे आवाहन पर्यावरण संवर्धन समितीचे समन्वयक अॅड. राहुल ठाणगे यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संदीप गेरंगे, सिद्धीनाथ मेटे महाराज, माधुरी चोभे, सागर दाणी, सचिन हिरवे यांच्यासह समितीचे सदस्य परिश्रम घेत आहेत.

## पोपटराव खोसे यांना जीवनगौरव!

जलसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ज्येष्ठ पर्यावरणप्रेमी पोपटराव खोसे यांना आत्म निर्धार फाउंडेशनचा 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येईल. सन्मानचिन्हे, शाल, छोटेसे रोपटे आणि ५ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणाऱ्या एका व्यक्तीला प्रतिवर्षी हा पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती पर्यावरण संवर्धन समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी दिली.

# दुर्गराज रायगड येथे ५ व ६ जूनला शिवराज्याभिषेक सोहळा

## अहिल्यानगर जिल्ह्यातील मावळ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

नगर – दुर्गराज रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा ५ व ६ रोजी जून भव्य सोहळा यंदाही उत्साहात साजरा होणार आहे. राज्याभिषेक सोहळा समितीच्या संयोजनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे सदस्य शिवव्याख्याते ओंकार व्यवहारे यांनी दिली.

या सोहळ्याच्या निमित्ताने 'धार तलवारची, युद्धकला महाराजांची', 'जागर शिवशाहीरांचा..स्वराज्याच्या इतिहासाचा' आणि 'सोहळा पालखीत, स्वराज्याच्या ऐश्वर्यात' यासारख्या विशेष कार्यक्रमांची सादरीकरणे होणार आहेत. यामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण पुन्हा उभा राहणार असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे दर्शन घडणार आहे.


या कार्यक्रमात छत्रपती संभाजी महाराज व युवराजकुमार शहजीराजे छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे ठळक आकर्षण :– ऐतिहासिक मिरवणुका आणि पालखी सोहळा, विविध सांस्कृतिक आणि शाहिरी कार्यक्रम, शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिके, महाराष्ट्रातील आणि देशभरातील शिवप्रेमींचा मोठा सहभाग, या सोहळ्यासाठी राज्यभरातील शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक कार्यक्रमाची तयारी युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती महाराज यांच्या नियोजनात जोमात सुरू आहे.

५ जून रोजी दु.३.३० वा.राजमाता जिजाऊ साहेब यांच्या समाधीस अभिवादन करुन शिवराज्याभिषेक सोहळ्यास प्रारंभ (जिजाऊ समाधी स्थळ, पाचाड), दु.४ वा. युवराज संभाजी महाराज व युवराजकुमार शहजीराजे छत्रपती यांचे स्वागत व शिवभक्तांच्या समवेत पायी गड चढण्यास प्रारंभ (स्थळ : नाणे दरवाजा), दु.४.१५ वा. गडपूजन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती व रायगड जिल्हा प्रशासन यांच्या उपस्थितीत, (स्थळ : नगारखाना) दुपारी ४.३० वा. – युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती महाराज यांच्या हस्ते 'धार तलवारीची.. युद्धकला महाराष्ट्राची... युद्धकलेच्या प्रात्यक्षिकास प्रारंभ (स्थळः होळीचा माळ), सायं. ७ वा. ढोलवादन, लेझीम प्रात्यक्षिके व वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदंगाचा गजर. (स्थळः होळीथा माळ), रात्री ८ वा. – जागर शिवशाहिरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा... (स्थळः राजसदर), रात्री ९ वा. गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ (स्थळः शिरकाई मंदिर), रात्री ९.३० वा. – वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजन (स्थळः अगदीश्वर मंदिर),

६ जून रोजी सकाळी ०७.०० वा. – युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे हस्ते पारंपारिक वाद्यांच्या गजरात ध्वजपूजन व ध्वजारोहण (स्थळः नगारखाना), सकाळी ७.३० वा. शाहिरी कार्यक्रम (स्थळः राजसदर), सकाळी ९.३० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे राजसदरेवर आगमन, सकाळी ९.५० वा. – युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे राजसदरेवर आगमन, सकाळी १० वा. – युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्या हस्ते श्री शिवछत्रपती महाराजांच्या उत्सवमूर्तीस अभिषेक, सकाळी १०.२० वा. – श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजसदरेवरील सिंहासनारूढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक, सकाळी १०.३० वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांचे शिवभक्तांना संबोधन, सकाळी ११ वा. 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा शिवराज्याभिषेक' पालखी सोहळ्यास प्रारंभ, दुपारी १२ वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे जगदीश्वर मंदिर येथे आगमन, दुपारी १२:१५ वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्याकडून वारकरी संप्रदायास पंढरीच्या वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान (स्थळः जगदीश्वर मंदिर), दुपारी १२.२५ वा. – श्री शिवछत्रपती महाराजांच्या समाधीस अभिवादन.... असे कार्यक्रम होतील.

या ऐतिहासिक सोहळ्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील मावळ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे सदस्य शिवव्याख्याते ओंकार व्यवहारे यांनी केले आहे.

# वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना ब्राह्मणभूषण पुरस्कार जाहीर



नगर – 'आम्ही सारे ब्राह्मण' व 'ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका'पुणे या नियतकालिकांच्या वर्धापनदिनी टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे १९ जून रोजी संध्याकाळी ५.३० वाजता पुरस्कार प्रदान समारंभ होत असून, यामध्ये वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना यंदाचा 'ब्राह्मण भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मानपत्र, पुणेरी पगडी आणि भेटवस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

काशी येथे शुक्ल यजुर्वेदातील सुमारे २००० मंत्रांचे अत्यंत दुर्मिळ 'दण्डक्रम पारायण' ५० दिवसांत पूर्ण करून इतिहास रचणारे १९ वर्षीय वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांना यंदाचा 'ब्राह्मण भूषण' पुरस्कार देण्यात येत आहे. देवव्रत रेखे यांच्या या ऐतिहासिक कामगिरीनंतर अनेक मोठे विद्वान आश्चर्यचकित झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या तरुण वेदमूर्तींचे अभिनंदन केले आहे.

यंदाचा इंदुमती–वसंत करिअर भूषण पुरस्कार माध्यम तज्ज्ञ, व्याख्याते व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवउद्योजक विनायक पाचलग यांना जाहीर झाला आहे. रोख रुपये १० हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. रामचंद्र देखणे स्मृती कीर्तनकार पुरस्कार नव्याने सुरू केला आहे. यंदाचा युवा कीर्तनकार पुरस्कार ह.भ.प. अमृता कळंबेळकर यांना जाहीर झाला आहे. रोख रुपये ५ हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे.

तसेच ब्राह्मण समाजासाठी प्रदीर्घ काळ काम करणाऱ्या संस्थेला 'भगवान परशुराम ब्राह्मण संस्था पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येत आहे. यावर्षीचा पुरस्कार 'कर्हाडे ब्राह्मण संघ, पुणे' या संस्थेला ९६ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देण्यात येणार आहे. रोख रुपये ५ हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे.



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अहिल्यानगर अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती झाल्यानंतर खासदार संजय राऊत यांच्या हस्ते नियुक्तीपत्र स्वीकारताना युनूस टेंगे. (छाया – समीर मन्यार)

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अहिल्यानगर अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी माजी सैनिक युनूस टेंगे

नगर – शिर्डी येथे आयोजित जिल्हास्तरीय मेळाव्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अहिल्यानगर जिल्हा अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी माजी सैनिक युनूस टेंगे यांची नियुक्ती करण्यात आली.

खासदार संजय राऊत यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या मेळाव्यास विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार सुनील शिंदे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्ते उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्हा शिवसेनाप्रमुख राजेंद्र दळवी यांच्या शिफारशीनुसार युनूस टेंगे यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी युनूस टेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली शेख अकबर, संदीप काकडे, राजमोहम्मद शेख, साजिद हवलदार, दिनकर गायकवाड, कृष्णा खेडकर यांच्यासह अनेक माजी सैनिकांनी पक्षात प्रवेश केला.

# राष्ट्रीय आइस हॉकी स्पर्धेसाठी ऐम स्पोर्टस् अकॅडमीच्या १२ खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड

**देहरादून येथे होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत चमक दाखविण्याची संधी; अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब, पुण्यातील निवड चाचण्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी**



ऐम स्पोर्टस् अकॅडमीच्या १२ खेळाडूंची राष्ट्रीय आइस हॉकी अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. या खेळाडूंचा जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे व बाळासाहेब खोमणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नगर – अहिल्यानगरच्या ऐम स्पोर्टस् अकॅडमीच्या १२ खेळाडूंची राष्ट्रीय आइस हॉकी अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. या खेळाडूंचा जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे व बाळासाहेब खोमणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्राचे आणि अहिल्यानगरचे नाव उंचावावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

अकॅडमीचे प्रशिक्षक शुभम करपे आणि प्रमोद डोंगरे यांनीही खेळाडूंना शुभेच्छा देताना त्यांच्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले. गेल्या काही वर्षांपासून आइस हॉकी आणि आइस स्केटिंग या खेळांच्या प्रसारासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आइस हॉकी असोसिएशन महाराष्ट्रचे सचिव सूरज पवार यांनीही निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. त्यांनी खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देत महाराष्ट्र संघ उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला.

राष्ट्रीय आइस हॉकी अजिंक्यपद स्पर्धा ११ जून ते ८ जुलै या कालावधीत देहरादून येथे होणार आहे. देशभरातील विविध राज्यांतील अव्वल खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असून, महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने निवड झालेल्या खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

पुणे येथील पी–५२ आइस स्केटिंग अरेना येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय निवड चाचण्यांमध्ये ऐम स्पोर्ट्स अॅकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, वेग, तांत्रिक प्राविण्य आणि संघभावनेचे प्रदर्शन करत निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये अंडर–१२ मुलांच्या गटातून राजवीर जगताप याची निवड झाली आहे. अंडर–१२ मुलींच्या गटातून मतीशा सोनवणे, अर्फा खान आणि तनया क्यादर यांनी महाराष्ट्र संघात स्थान मिळवले आहे. अंडर–१५ मुलांच्या गटातून भावेश वाघ याची निवड झाली असून अंडर–१८ मुलांच्या गटातून ईशांत गर्जे, अर्श मुलाणी आणि आयुष पगारे यांना संधी मिळाली आहे.

वरिष्ठ पुरुष गटात वेदांत गर्जे, कार्तिक मिश्रा, आदित्य मरकड यांची निवड झाली असून, वरिष्ठ महिला गटात अभिजिता जगताप हिने महाराष्ट्र संघात स्थान पटकावले आहे. विविध वयोगटांमधून एकाच अॅकॅडमीच्या १२ खेळाडूंची झालेली निवड ही अभिमानास्पद ठरली आहे.

अहिल्यानगरमध्ये पारंपरिक खेळांसोबतच आइस हॉकीसारख्या आधुनिक आणि आव्हानात्मक खेळांबद्दल वाढणारी आवड आणि ऐम स्पोर्ट्स अॅकॅडमीसारख्या संस्थांचे योगदान यामुळे जिल्ह्यातील खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर संधी मिळत आहे. या निवडीमुळे भविष्यात आणखी खेळाडूंना प्रेरणा मिळणार असून आइस हॉकी क्षेत्रात अहिल्यानगरचे नाव देशभरात अधिक ठळकपणे झळकण्याची अपेक्षा आहे, असे प्रशिक्षक शुभम करपे म्हणाले.



१७ व्या दोन दिवसीय शब्दगंध साहित्यिक संमेलनात अॅड. अनुराधा येवले यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

# शब्दगंध साहित्यिक संमेलनात अॅड. अनुराधा येवले यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

नगर – १७ व्या दोन दिवसीय शब्दगंध साहित्यिक संमेलनात अॅड. अनुराधा येवले यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. अॅड. अनुराधा येवले यांना सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी शंभराव्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष योगेश सोमन, प्रमुख पाहुणे आयएएस अधिकारी गुलाबराव खरात, येरवडा कारागृहाचे अधीक्षक इन्स्पेक्टर रेवण कानडे, संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे, स्वागताध्यक्ष नगरसेवक सुरेश बनसोडे व सौ. बनसोडे, शब्दगंध साहित्य परिषदेचे अध्यक्ष उद्योजक राजेंद्र उदागे, श्री. पांडुळे, शर्मिला गोसावी, घोलप मॅडम, स्वाती ठुबे आणि सुनील गोसावी तसेच साहित्यिक, कवी, लेखक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

शब्दगंध साहित्य संमेलनाच्या पहिल्या दिवशीच्या परिसंवाद सत्रात 'आधुनिक साहित्यातील स्त्री जीवनाचे चित्रण' या विषयावर परिसंवादात अॅड. अनुराधा येवले यांनी सहभाग घेऊन स्त्री जीवनाचे चित्र मांडले.

# राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार नगरचे विजय भालसिंग यांना जाहीर




नगर – सामाजिक, धार्मिक व पर्यावरण क्षेत्रात सुरु असलेल्या निस्वार्थ कार्याबद्दल महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेच्या वतीने येथील विजय भालसिंग यांना राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. १३ जून रोजी मुंबई येथे राष्ट्रीय कार्य दर्पण गौरव संमेलन होणार आहे. या संमेलनात भालसिंग यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती संमेलनाचे आयोजक सलमा एन.खान यांनी दिली.


विजय भालसिंग सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात गेल्या दोन दशकापासून योगदान देत आहेत. वाळकी (ता. नगर) येथील असलेले भालसिंग एसटी बॅकेची नोकरी सांभाळून निस्वार्थपणे योगदान देत असून, कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान व वर्गणी न घेता स्वखर्चातून सामाजिक कार्य करत आहे. वृक्षरोपण व संवर्धनासाठी ते सातत्याने कार्य करत आहे.

उन्हाळ्यात पशु–पक्ष्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून पाणवठे तयार करुन पाणी उपलब्ध करणे, विविध परिसरात पक्ष्यांसाठी झाडांवर धान्य व पाण्याची भांडी बसविणे, सर्वत्र वाढत चाललेल्या सिमेंटच्या जंगलामुळे पशु–पक्ष्यांचे अस्तित्व राहण्यासाठी नारळाच्या साली पासून कृत्रिमरीत्या पक्ष्यांसाठी बनवलेले घरटी बसविणे आदी निसर्ग व पर्यावरणपुरक उपक्रम ते सातत्याने राबवित आहेत. दरवर्षी आषाढी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीची सेवा करत आहे. तसेच वाळकी पंचक्रोशीतील विविध प्रश्नांवर आवाज उठवून ते सोडविण्यासाठी शासकीय स्तरावर देखील ते पाठपुरावा करत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# प्रल्हाद बोराडे, धर्मराज चवरे, अॅड. मनिषा महाजन, अजय भालकर यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**अहिल्यानगर येथील विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत ५ जूनला कुमार केतकर यांच्या हस्ते वितरण**






नगर – महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून संघटनेच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या अहिल्यानगर येथील बैठकीत ५ जून रोजी सायंकाळी ज्येष्ठ संपादक व माजी खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते सदरच्या पुरस्कारांचे वितरण होणार असल्याची माहिती महाअंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी दिली.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांचे प्रमुख उपस्थितीत झालेल्या जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या बैठकी श्री.बनसोडे यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बुधवंत, उपाध्यक्ष प्रमोद भारूळे, कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, प्रधान सचिव विनायक सापा, नगर शहर अध्यक्ष भारतभूषण भागवत, विनायक ताकपेरे आदी उपस्थित होते.

अधिक माहिती देतांना श्री.बनसोडे म्हणाले की, संघटनेची विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक अहिल्यानगर येथे ५ ते ७ जून दरम्यान बडी साजन मंगल कार्यालय येथे होत आहे.

या वेळी अंधश्रद्धा निर्मूलन कार्यात उत्कृष्ट काम करणारे प्रल्हाद बोराडे (जामनेर, जळगाव) यांना महा.अंनिस समर्पित ज्येष्ठ कार्यकर्ता पुरस्कार, महा.अंनिस कृतिशील आदर्श शिक्षक पुरस्कार धर्मराज चवरे (मोहोळ, सोलापूर), महा अंनिस कृतिशील महिला कार्यकर्ती पुरस्कार

अॅड. मनिषा महाजन (आकुर्डी, पुणे) तर महा. अंनिस मधुरजग युवा प्रेरणा पुरस्कार सांगलीच्या अजय भालकर (इस्लामपूर, सांगली) यांना देण्यात येणार आहेत. सदरच्या पुरस्काराचे वितरण कुमार केतकर यांच्या हस्ते ५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे.

यावेळी महा अंनिस च्यावतीने जात मुक्ती करणाऱ्या सौंदाळा ग्रामपंचायतीचा सन्मान करण्यात येणार असून सरपंच शरद आरगडे हे हा सन्मान स्वीकारणार आहेत. स्वतःला झोकून देऊन अंधश्रद्धा निर्मूलनात कार्यरत असणाऱ्या समर्पित कार्यकर्त्यांना दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात.

मानपत्र, सन्मान चिन्ह, प्रत्येकी रोख पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

# 'स्वामीये शरणम अय्यप्पा'च्या जयघोषात भक्तीभावाने श्री अय्यप्पा मंदिराचा प्रतिष्ठापना वार्षिकोत्सव साजरा



भगवान श्री अय्यप्पा मंदिराचा ३२ वा प्रतिष्ठापना वार्षिकोत्सव भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने केरळच्या पारंपरिक चेंडा मेलम आणि इतर वाद्यांच्या गजरात निघालेल्या शोभायात्रेत भाविक पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले.

नगर – अहिल्यानगर येथील भगवान श्री अय्यप्पा मंदिराचा ३२ वा प्रतिष्ठापना वार्षिकोत्सव भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा झाला. शकडो भाविकांच्या 'स्वामीये शरणम अय्यप्पा' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. यानिमित्त आयोजित विविध धार्मिक विधींमध्ये, महापूजा, शोभायात्रेत भाविकांनी सहभाग नोंदविला. यावेळी काढण्यात आलेली शोभायात्रा वार्षिकोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले. केरळच्या पारंपरिक चेंडा मेलम आणि इतर वाद्यांच्या गजरात निघालेल्या शोभायात्रेत महिला भाविक पारंपरिक वेशभूषेत नारळाच्या करवंट्यामधील दिवे घेऊन तेसेच पुरुष भाविक व अय्यप्पा सेवा समितीचे पदाधिकारी उत्साहाने सहभागी झाले होते.

मंदिराच्या ३२ वा प्रतिष्ठापना वार्षिकोत्सवानिमित्त मंदिरात पहाटेपासूनच वेदमंत्रांच्या विविध पूजा करण्यात आल्या. यामध्ये महागणपती हवन, उषा पूजा, महामृत्युंजय होम, कैलास पूजा, उषा पूजा, भगवती सेवा. पुष्पाभिषेकम, अथाझपूजा, उच्छा पूजा व हरीवर्षम पूजा आधी विविध पूजा झाल्या. यानिमित्ताने मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. महाआरती नंतर मंदिर परिसरात आतिषबाजी करून आनंदोत्सव साजरा झाला.

यावेळी श्री अय्यप्पा सेवा समितीचे अध्यक्ष बाबु टायरवाले, उपाध्यक्ष राजू लक्ष्मण, सचिव वसंत सिंग यांनी उपस्थित भाविकांचे स्वागत केले. यावेळी विचार भारतीचे रवींद्र मुळे, सुधीर लांडगे, महेंद्र जाखेटे, विशारद पेटकर, मनोज झंवर, डॉ.निळकंठ ठाकरे, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, अशोक दहिफळे, सुरेश क्षिरसागर आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपानंतर शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# 'जेईई अॅडव्हान्स्ड' परीक्षेत वेदांत देशमाने याचे यश

## संपूर्ण देशातून मिळवला ६२६ वा रँक



नगर – देशातील कठीण मानल्या जाणाऱ्या 'जेईई अॅडव्हान्स्ड २०२६' या परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला आहे. यामध्ये वेदांत वैभव देशमाने या विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केले आहे. त्याने संपूर्ण देशात ६२६ वा ऑल इंडिया रँक पटकावला.

या रँकमुळे देशातील आघाडीच्या नामांकित आयआयटी कॉलेजमध्ये त्याची निवड निश्चित झाली आहे. वेदांतने हे उज्वल यश आजोबा कै. सुहास अनंत देशपांडे यांना खऱ्या अर्थाने एक भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून समर्पित आहे.

अत्यंत चिकाटी, नियमित अभ्यास आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर हे यश मिळवल्याचे त्याने सांगितले.

# केवळ तिघांसाठी सोडली मोठी बस!




शेगाव येथील गजानन महाराज संस्थानने भक्तांच्या सेवेसाठी केलेल्या निःस्वार्थ आणि तत्परतेने कामाचे एक मनोवेधक चित्रण इन्स्टाग्रामवरून समोर आले आहे. प्राची नागपूरकर यांनी 'सोशल मीडिया'वर आपला वैयक्तिक अनुभव शेअर करत संस्थानच्या सेवाभावनेचे खरे दर्शन घडवले आहे.

नागपूरकर यांनी सांगितले, की शेगावमधील आनंद विहार भक्त निवासात त्यांचा मुक्काम होता. तेथील वातावरण अत्यंत स्वच्छ, शांत आणि उत्तम व्यवस्थित होते. भक्तांच्या सोयीसाठी सर्व सुविधा व्यवस्थित उपलब्ध होत्या. त्यांची पुढची ट्रेन पहाटे चार वाजता होती. त्यामुळे रात्री तीन वाजता स्टेशनवर सोडण्याची विनंती संस्थानकडे करण्यात आली होती; मात्र केवळ पंधरा मिनिटांतच संस्थानने ५५ सीटर मोठी बस तयार करून दिली. केवळ तिघे प्रवासी असूनही कोणतीही अडचण न सांगता ही सेवा तत्काळ पुरवण्यात आली.

आजच्या धावपळीच्या काळात अशा मनापासून आणि तत्परतेने केल्या जाणाऱ्या सेवेचे दर्शन दुर्मीळच असते, असे प्राची यांनी नमूद केले. संस्थानच्या या सेवाभावनेने आणि उत्कृष्ट व्यवस्थापनाने त्यांची श्रद्धा अधिक दृढ झाली. शेगाव संस्थानचे मनःपूर्वक आभार. आपली ही सेवा आणि व्यवस्थापन खरोखरच प्रेरणादायी आहे, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले. महाराज आणि संस्थानवरील अपार श्रद्धा घेऊन त्या परतल्या.

दरम्यान, संस्थानकडून भक्तांच्या सेवेसाठी २४ तास निशुल्क बस सेवा सुरू असते. आनंद विहार भक्त निवास, विसावा आणि रेल्वे स्टेशन ते मंदिर या मार्गावर अर्ध्या तासाच्या अंतराने ही बस धावते. एखाद्या भक्ताने विनंती केली, तरी बस नियमित येत असते; मात्र या वेळी केवळ तीन भक्तांसाठी विशेषतः ५५ सीटर बस उपलब्ध करून देण्यात आल्याने प्राची यांना ही सेवा अधिक हृदयस्पर्शी वाटली.

गजानन महाराज मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भक्ताला अशी निःस्वार्थ सेवा मिळावी, हीच संस्थानची भावना असल्याचे या अनुभवातून स्पष्ट होते. 'गण गण गणात बोते' अशा भावनेने भक्त सेवा करणारे शेगाव संस्थान खरोखरच भक्तिमार्गातील एक आदर्श उदाहरण आहे.

# कॅलिडोस्कोप

## आयर्लंडमध्ये साप का नाहीत?

ब्राझीलमध्ये भरपूर साप आढळतात. जगातल्या विविध देशांमध्येही साप पहायला मिळतात. मात्र एका देशात साप अस्तित्वातच नाहीत. कोणत्या देशात साप नसावेत, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. आयर्लंड या देशात साप नाहीत. यामागे बरीच कारणं आहेत. काही पौराणिक कथाही आहेत. त्यानुसार सेंट पॅट्रिक नावाच्या एक संताने ख्रिस्ती धर्माच्या सुरक्षेसाठी इथल्या सर्व सापांना गोळा केलं आणि समुद्रात फेकून दिलं. यासाठी त्यांना ४० दिवस उपाशी रहावं लागलं. ही झाली आख्यायिका. पण काही शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार आयर्लंडमध्ये कधीही साप नव्हते. या भागात एकेकाळी साप असले तरी प्रचंड थंडीमुळे ते नष्ट झाले, असं काही शास्त्रज्ञांचं मत आहे. प्रचंड थंडीमुळे इथले साप नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हेच कारण ग्राह्य धरलं जातं.



## नरच देतो पिलांना जन्म!

जगात हजारो प्रकारचे प्राणी आहेत. प्रत्येक प्राण्याची मादी पिलांना जन्म देते किंवा अंडी घालते; मात्र 'सी-हॉर्स' (समुद्री घोडा) हा प्राणी याला अपवाद आहे. जगात हा एकमेव असा जीव आहे, ज्यामध्ये नर आपल्या पोटात बाळ वाढवतो आणि शेवटी त्याला जन्म देतो. म्हणजेच नर समुद्री घोडा प्रेग्नंट होतो. त्यामुळे समुद्री घोड्याची ही अनोखी प्रजनन प्रक्रिया जीवशास्त्रातील सर्वात रंजक विषयांपैकी एक मानली जाते.


बहुतेक प्रजातींमध्ये मादी गर्भधारणा करते; पण 'सी-हॉर्स'मध्ये ही भूमिका उलट असते. मादी 'सी-हॉर्स' अंडी तयार करते; मात्र ती नराच्या शरीरात हस्तांतरित करते. त्यानंतर नरच प्रसूतीची वेदना सहन करून पिल्लांना जन्म देतो. समुद्री घोड्याची प्रजनन प्रक्रिया अत्यंत रोचक आहे. सर्वप्रथम नर आणि मादी एक खास प्रणय नृत्य करतात. ते आपापल्या शेपट्या एकमेकांमध्ये गुंफतात, एकत्र पोहतात आणि



तासनतास नृत्य करतात. या नृत्यानंतर मादी आपली अंडी नराच्या पोटावर असलेल्या विशेष पिशवीत ठेवते. अंडी त्या पिशवीत गेल्यानंतर नर त्यांचे संगोपन सुरू करतो. पिशवीच्या आत रक्तवाहिन्या तयार होतात. त्या अंड्यांना ऑक्सिजन आणि पोषण पुरवतात. ही प्रक्रिया सस्तन प्राण्यांमधील प्लेसेंटा प्रमाणे कार्य करते. ही गर्भावस्था दहा दिवसांपासून सहा आठवड्यांपर्यंत असू शकते.

गर्भधारणेनंतर पिल्ले पूर्ण विकसित होतात, तेव्हा नर 'सी-हॉर्स'लाला प्रसूती वेदना सुरू होतात. तो आपले शरीर वारंवार वाकवतो आणि जोरदार हालचाल करून शेकडो ते हजारो पिल्लांना पाण्यात सोडतो. एका वेळी १०० ते २००० छोटे 'सी-हॉर्स' जन्म घेतात. जन्मानंतर ही पिल्ले अगदी लहान 'सी-हॉर्स'सारखी दिसतात आणि लगेच स्वतंत्र जीवन सुरू करतात. त्यानंतर आई-वडील त्यांची कोणतीही काळजी घेत नाहीत. शास्त्रज्ञांच्या मते, ही व्यवस्था प्रजातीच्या अस्तित्वासाठी अत्यंत फायदेशीर आहे. मादी अंडी दिल्यानंतर लगेच नवीन अंडी तयार करण्यास सुरुवात करू शकते, तर नर आधीच्या अंड्यांची काळजी घेतो. त्यामुळे प्रजननाचा वेग खूप वाढतो. 'सी-हॉर्स'ची ही पिशवी फक्त संरक्षणच देत नाही, तर तिच्या आतमधील पाणीही नियंत्रित करते.

## सासू पळाली जावयासोबत!



समाजात काही नाती ही विश्वास आणि आदर या पायावर टिकून असतात. कुठल्याही नात्यामध्ये माणसाने मर्यादा पाळायची असते. त्याचा विसर पडला, की होत्याचं नव्हतं व्हायला वेळ लागत नाही. क्षणिक सुखासाठी माणूस अनेकांचं आयुष्य उद्ध्वस्त करतो. अनेक मनांना वेदना देतो. अशीच एक घटना उत्तर प्रदेशच्या आगरा जिल्ह्यात अछनेरा क्षेत्रात घडली आहे. नात्यांवरचा विश्वास उडेल, लाज वाटावी असं हे प्रकरण आहे. या प्रकरणात सासूला आपल्या जबाबदारीचा विसर पडला. तिने सर्व मर्यादा सोडून दिल्या. मुलीचा नवरा म्हणजे जावयासोबतच ती पळून गेली. गावात एका लग्न सोहळ्याच उत्साह होता. शहनाई वादन सुरू होतं. या दरम्यान जावई आपल्या सासरी आला. जावई पाच मुलांचा पिता आहे.

दुपारची वेळ होती. म्हणून सासूला घराच्या मागे शेतात मेंदी तोडण्याच्या बहाण्याने बोलावलं. काहीतरी वाईट घडणार आहे, याचा कुटुंबीयांना जराही संशय आला नाही. बराच वेळ झाला तरी सासू आणि जावई शेतातून परतले नाहीत. म्हणून काही नातेवाइक शेताकडे गेले. तिथलं दृश्य पाहून त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. सासू आणि जावयाला त्यांनी नको त्या अवस्थेत पाहिलं. एकच आरडोओरडा, गदारोळ सुरु झाला. जावई आणि सासू लगेच तिथे असलेल्या बाईकवर बसून पसार झाले.

महत्वाचं म्हणजे कुटुंबीयांना दोघांमधल्या अफेअर बद्दल समजण्याची पहिली वेळ नाही. या नात्यातला कडवटपणा १२ वर्षांपूर्वीचा आहे. दोन सख्ख्या भावांचं लग्न दोन सख्ख्या बहिणींसोबत झालं. लग्नाच्या तीन वर्षांनंतर मोठ्या जावयाची सासू सोबत जवळीक वाढली. १२ वर्षांपूर्वी सुद्धा दोघे समाजाच्या बेड्या तोडून पळून गेले होते. त्या वेळी त्यांना दिल्लीतून शोधून परत आणण्यात आलं. लोकलाजेस्तव विषय शांत करण्यात आला; पण आग विझलेली नव्हती. पुन्हा एकदा दोघांना नको त्या अवस्थेत पकडलं.

हे अनैतिक संबंधांचं प्रकरण दोन्ही कुटुंबांची फक्त बदनामी करणारं आहे. यामुळे जवळच्या माणसांच्या डोळ्यात अश्रू आहेत. महिलेच्या पतीला शॉक बसला असून जावयाच्या पत्नीचीसुद्धा वाईट अवस्था आहे.




## शेवटची फ्लाईट...!

एका विमान कंपनीची फ्लाईट अटेंडन्ट नेहमीप्रमाणे नोकरीवर हजर झाली आणि विमानाने टेकऑफ घेताच प्रवाशांची सेवा करू लागली. पण तिच्या नशीबात काही वेगळेच होते. तिने कधी याचा विचारही केलेला नव्हता. आपल्याबाबत असे इतक्या लवकर कसे घडू शकते याचा विचारच तिच्या मनात आला नव्हता. त्यामुळेच तिने स्वतःला चिमटा काढून पाहिला आणि आपण स्वप्नात तर नाही ना... याची खात्री करून घेतली.

तिची ही अवस्था होण्याचे कारण म्हणजे कॅसिनो गेममध्ये ५०० रुपये लावून तिने तब्बल २१ कोटीची रक्कम जिंकली होती. कॅसिनो डेज प्लॅटफॉर्मवर एक लिमिटेड ऑफर सुरू होती. त्यात एक लाख रुपयांच्या जमा रकमेवर १५० टक्के बोनस मिळत होता. एअर होस्टेस म्हणाली की, हा गेम खेळताना आधी मी एक लाख रुपये लावले. आधी मला दहा कोटी आणि नंतर २० कोटी व शेवटी २१,८३,०२,६७२ कोटी रुपये इतकी रक्कम मिळाली. ती माझ्या खात्यात जमा झाली. हे कळल्यावर खरेतर स्वतःवरच विश्वासच बसत नव्हता. ही रक्कम जिंकल्यानंतर तिने कॅसिनो डेजच्या सपोर्ट टीमला संपर्क साधला. त्यांनी सांगितले की बातमी खरी आहे. तुम्ही करोडपती झाला आहात. पुढे या महिलेने फ्लाईटचा इंटरकॉम उचलला आणि थेट घोषणाच करून टाकली. 'लेडीज एण्ड जंटलमन, मी तुमची एअर होस्टेस बोलत आहे आणि माझी ही शेवटची फ्लाईट आहे...' हे वाक्य ऐकून प्रवासी घाबरले. परंतु एअर होस्टेसने खरी बाब सांगितली. त्यानंतर प्रवाशांनी तिला शुभेच्छा देण्यास रांग लावली आणि केबिनमध्ये उपस्थित लोक चियर्स करू लागले.

## 'रील्स'च्या अतिनादाचा परिणाम



'सोशल मीडिया'ने मानवी आयुष्याला अभूतपूर्व वेग दिला, संवादाची नवी दारे उघडली आणि प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले; परंतु या डिजिटल क्रांतीसोबतच एक अदृश्य मानसिक आणि सामाजिक संकटही वेगाने वाढताना दिसत आहे. उत्तराखंडमधील हरिद्वार येथे घडलेली अलिकडची घटना त्याच संकटाची अस्वस्थ करणारी झलक आहे. एका व्यक्तीने स्वतःच्या जिवंत पत्नीचा प्रतीकात्मक अंत्यसंस्कार करून पिंडदान केल्याची घटना केवळ कौटुंबिक वादाचा विषय नाही, तर ती आधुनिक समाजातील नात्यांच्या बदलत्या स्वरूपावर, 'सोशल मीडिया'च्या वाढत्या व्यसनावर आणि मानसिक असंतुलनाच्या धोकादायक टप्प्यावर प्रकाश टाकणारी घटना आहे.

भारतीय संस्कृतीत अंत्यसंस्कार आणि पिंडदान या केवळ धार्मिक विधी नाहीत; तर ते भावनिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील मानले जातात. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या आत्म्याच्या शांतीसाठी केले जाणारे हे विधी जिवंत व्यक्तीसाठी प्रतीकात्मकरित्या करणं हे समाजासाठी धक्कादायक ठरणं स्वाभाविक आहे. विशेषतः पतीने पत्नीचा फोटो नदीत विसर्जित करत 'ती माझ्यासाठी मेलेली आहे' असे जाहीर करणे हे केवळ संतापाचे प्रदर्शन नसून एका नात्याच्या मानसिक मृत्यूचे सार्वजनिक प्रदर्शन होते. यात वैयक्तिक वेदना आहे, अपमान आहे, असहायता आहे आणि त्याचबरोबर 'सोशल मीडिया'च्या अतिरेकाने नात्यांमध्ये निर्माण केलेली दरीही आहे. या घटनेच्या मुळाशी 'सोशल मीडिया' व्यसनाचा प्रश्न असल्याचे सांगितले जाते. पत्नी सतत इन्स्टाग्रामवर वादग्रस्त आणि भडक रील्स तयार करत होती आणि त्यावरून पती-पत्नीमध्ये सतत संघर्ष होत होता, अशी माहिती समोर आली. येथे प्रश्न केवळ रील्सचा नाही, तर आभासी जग आणि वास्तविक आयुष्य यांच्यातील संघर्षाचा आहे. आज 'सोशल मीडिया' अनेकांसाठी केवळ मनोरंजनाचे साधन राहिलेले नाही. ते ओळख, मान्यता, लोकप्रियता आणि अस्तित्व सिद्ध करण्याचे माध्यम बनले आहे.

## पॉपकॉर्नविषयी...

चित्रपट बघताना पॉपकॉर्न खाल्ले जातात. या सुट्टीच्या दिवसांमध्ये मुलांची छोटी भूक भागवण्यासाठीही पॉपकॉर्न हा उत्तम पर्याय असतो. एकूणच पॉपकॉर्न हा अनेकांचा आवडता पदार्थ आहे. तेव्हा पॉपकॉर्न खाण्याची सुरूवात नेमकी कधी झाली, याचा इतिहास काय याबद्दल रंजक माहिती जाणून घेऊ.




* प्राचीन काळात अमेरिकेतले मूळ निवासी पॉपकॉर्न खात असत. मग युरोपियन लोकांनीही पॉपकॉर्न खायला सुरूवात केली, असं म्हटलं जातं.
* पॉपकॉर्न तयार करणारं मशीन १३४ वर्षांपूर्वी म्हणजे १८८५ मध्ये तयार करण्यात आलं. अमेरिकेतल्या चार्ल्स क्रेटरने हे मशीन तयार केलं होतं. चार्ल्स शेंगदाणे भाजणारं मशीन बनवण्याच्या प्रयत्नात होता. मात्र नंतर त्याचा वापर पॉपकॉन बनवण्यासाठी होऊ लागला.
* जवळपास चार हजार वर्षांपूर्वी पॉपकॉर्नचा शोध लावण्यात आल्याचं म्हटलं जातं. न्यू मेक्सिकोमध्ये हा शोध लावण्यात आला. त्या काळात पॉपकॉर्नचा वापर सजावटीसाठी केला जात असे. पॉपकॉर्नपासून दागिने बनवले जात असत, असंही म्हटलं जातं.

शेवटची फ्लाईट

एका विमान कंपनीची फ्लाईट अटेंडन्ट नेहमीप्रमाणे नोकरीवर हजर झाली आणि विमानाने टेकऑफ घेताच प्रवाशांची सेवा करू लागली. पण तिच्या नशीबात काही वेगळेच होते. तिने कधी याचा विचारही केलेला नव्हता. आपल्याबाबत असे इतक्या लवकर कसे घडू शकते याचा विचारच तिच्या मनात आला नव्हता. त्यामुळेच तिने स्वतःला चिमटा काढून पाहिला आणि आपण स्वप्नात तर नाही ना... याची खात्री करून घेतली.

तिची ही अवस्था होण्याचे कारण म्हणजे कॅसिनो गेममध्ये ५०० रुपये लावून तिने तब्बल २१ कोटीची रक्कम जिंकली होती. कॅसिनो डेज प्लॅटफॉर्मवर एक लिमिटेड ऑफर सुरू होती. त्यात एक लाख रुपयांच्या जमा रकमेवर १५० टक्के बोनस मिळत होता. एअर होस्टेस म्हणाली की, हा गेम खेळताना आधी मी एक लाख रुपये लावले. आधी मला दहा कोटी आणि नंतर २० कोटी व शेवटी २१,८३,०२,६७२ कोटी रुपये इतकी रक्कम मिळाली. ती माझ्या खात्यात जमा झाली. हे कळल्यावर खरेतर स्वतःवरच विश्वासच बसत नव्हता. ही रक्कम जिंकल्यानंतर तिने कॅसिनो डेजच्या सपोर्ट टीमला संपर्क साधला. त्यांनी सांगितले की बातमी खरी आहे. तुम्ही करोडपती झाला आहात. पुढे या महिलेने फ्लाईटचा इंटरकॉम उचलला आणि थेट घोषणाच करून टाकली. 'लेडीज एण्ड जंटलमन, मी तुमची एअर होस्टेस बोलत आहे आणि माझी ही शेवटची फ्लाईट आहे...' हे वाक्य ऐकून प्रवासी घाबरले. परंतु एअर होस्टेसने खरी बाब सांगितली. त्यानंतर प्रवाशांनी तिला शुभेच्छा देण्यास रांग लावली आणि केबिनमध्ये उपस्थित लोक चियर्स करू लागले.



## असा आहे महागडा तुरुंग

तुरुंग म्हटला की तिथे कैदी असणारच. या कैद्यांवर प्रशासन बराच पैसाही खर्च करतं. त्याच्या रहाण्याची, खाण्याची, आरोग्याची व्यवस्था प्रशासनालाच करावी लागते. जगभरात अनेक तुरुंग आहेत. भारतातलेही बरेच तुरुंग प्रसिद्ध आहेत. मात्र जगातला सर्वात महागडा तुरुंग कोणता हे तुम्हाला माहीत आहे का? हा तुरुंग क्युबामध्ये आहे. इथे एका कैद्यावर कोट्यवधी रुपये खर्च होतात. 'ग्वांतानमो बे' असं या तुरुंगाचं नाव आहे. हा तुरुंग ग्वांतानमो खाडीच्या किनाऱ्यालगत आहे. या तुरुंगात ४० कैदी असून प्रत्येक कैद्यावर वर्षाला ९३ कोटी रुपये खर्च होतात. हा आकडा ऐकून प्रत्येकाचे डोळे विस्फारले असतील. या तुरुंगात १८०० पोलीस आहेत. प्रत्येक कैद्यामागे ४५ पोलीस आहेत. तुरुंगाच्या सुरक्षेसाठीच दरवर्षी ३९०० कोटी रुपये खर्च होतात. या तुरुंगात जागतिक स्तरावरचे अत्यंत धोकादायक कैदी आहेत. या तुरुंग परिसरात तीन इमारती असून दोन इमारतींमध्ये गुप्त मुख्यालयं आहेत. तसंच दोन रुग्णालयंही आहेत. वकिलांसाठीही वेगळी सोय करण्यात आली आहे. इथे वकील कैद्यांशी संवाद साधू शकतात. इथल्या कैद्यांना बऱ्याच सुविधा दिल्या जातात.



